

श्रीबाबांची निसर्गावरही संपूर्ण सत्ता होती.
उसळणारा आगीचा डोंब आणि मुसळधार पाऊस
आपल्या हातातला सटका उंचावून त्यांनी तावडतोब
थांबविला आणि शिरडीकरांना चकीत करून टाकले!

सप्टेंबर १९८३]

[किंमत १ रुपया

श्री [illegible] वाचनालय

# सौ. सुमित्रा विनायक आपटे यांचे दुःखद निधन



श्रीसाईबाबा संस्थान शिर्डी येथील मुख्य लेखाधिकारी व कार्यालय अधिक्षक श्री. विनायक श्रीधर आपटे यांच्या पत्नी सौ. सुमित्रा विनायक आपटे या सोमवार दिनांक २२ ऑगस्ट १९८३ रोजी, वयाच्या ५० व्या वर्षी, अल्पशा आजारानंतर श्रीसाईचरणी विलिन झाल्या.

साईबाबा हेच एकमेव दैवत मानून शेवटपर्यंत त्यांची अत्यंत मनोभावे सेवा सौ. आपटे यांनी केली. जीवनातील सर्वच गोष्टी मग त्या चांगल्या असोत किंवा वाईट असोत साईबाबांमुळेच घडतात अशी त्यांची दृढ श्रद्धा होती. सकाळी जेवण्यापूर्वी साईचरित्राचा एक अध्याय वाचण्याचा त्यांचा लहानपणापासूनचा नेम शेवटपर्यंत कायम होता. साईचरित्राची असंख्य पारायणे त्यांनी केलेली होती.

ईश्वर मृतात्म्यास सद्‌गती देवो हीच साईचरणी प्रार्थना.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

श्री

# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक


: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

**डॉ.श्री.दि.परचुरे**
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

**श्री.सदानंद चेंदवणकर**
( मराठी आवृत्ती )


## श्रीसाई वाक्सुधा


वर्ष ६२ वे) किंमत १ रुपया ( अंक ६

सप्टेंबर १९८२

दूरध्वनी
८८२२५६१

: कार्यालय :
" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई-४०० ०१४.

वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.



# श्रीसाई वाक्सुधा

संबंध जैसा पितापुत्र ।
गुरु हे उपमा नाममात्र ।
पिता करी इहसुखापात्र ।
गुरु इहामूत्त सुखदाता ॥५९॥

पिता अर्पील क्षणिक वित्त ।
गुरु अर्पील क्षयातीत ।
अविनाश वस्तु करील प्रतीत ।
अपरोक्ष हातात देईल ॥६०॥

माता नऊ मास पोटीं धरी ।
जन्म देतां घाली बाहेरी ।
गुरुमातेची उलटी परी ।
बाहेरील भीतरीं घालील ॥६१॥

अंती 'गुरु गुरु' स्मरणकरितां ।
शिष्य निःशंक लाभेल सायुज्जता ।
मग तो स्वयें गुरुनें हाणितां ।
पूर्ण ब्रम्हता लाभेल ॥६२॥

गुरु करींचा आघात ।
करील जन्म मरण निःपात ।
गुरुकरिता देहाचा अंत
कोण मग भाग्यवंत यापरता ॥६३॥

—श्रीसाई सच्चरित अध्याय ५२ वा.

# सुवचन

विद्याविहीनः पशुः

मातेव रक्षति पितेव हिते नियुङ्क्ते
कान्तेव चापि रमयत्यपनीय खेदम् ।
लक्ष्मी तनोति वितनोति च दिक्षु
कीर्तीम्
किं किं न साधयति कल्पलते व
विद्या ॥


विद्या मनुष्याचे आईप्रमाणे रक्षण करते, पित्याप्रमाणे त्याला हित-मार्गाला लावते, त्याचे दुःख व शीण दूर करून पत्नीप्रमाणे त्याचे मन रिझविते, त्याची संपत्ति वाढविते, आणि सर्व दिशात किर्ती पसरविते. अशाप्रकारे कल्पवल्लीप्रमाणे असलेली ती विद्या त्याला काय बरे मिळवून देत नाहीं? अर्थात् सर्व काही मिळवून देते. म्हणून ज्याला विद्या नाहीं तो हतभागी पशूच समजावा.

# अनुक्रमणिका सप्टेंबर १९८३


१) संपादकीय — संत चूडामणी श्रीसाईबाबा
२) संतांची पुण्यभूमी — श्री. विजय सह्यागते
३) शिरडीच माझे पंढरपूर — श्री. लक्ष्मणराव रापतवार
४) बाबांनी मला मोहित केले — श्री. पी. एन. भास्करे
५) दाता, दातृत्व आणि दान — प्रा. र. श्री. पुजारी
६) नित्य मी जिवंत — डॉ. कु. शुभांगी पितळे
७) प्रभादेवीचा श्री सिद्धि विनायक — श्री. गणपतराव सामंत
८) विशेष पुण्याईचे फळ — श्री. मधुसूदन करंबेळकर
९) जया मनी जैसा भाव — ॲडव्होकेट श्री. के. के. थिटे
१०) दत्तावतार साईबाबा — श्री. दिगंबर गंधे
११) साईकृपेने लग्न पार पडले — सौ. सुनंदा वेढीकर
१२) भाव भक्तीची शिरापुरी खा — श्री. चंद्रकांत गरगटे
१३) साई तुझे नाम स्मरतो — श्री. दत्താराम घुगे
१४) ही पण साईलीलाच — श्री. ओमप्रकाश व्यवहारे
१५) करंडा सापडला — सौ. निर्मला राजे
१६) बाबा नवयुगाचे शिल्पकार — श्री. प्रमोदकुमार रायसोनी
१७) श्री. साईबाबांचा चमत्कार — डॉ. एन. पी. डांगे
१८) साईकृपेने बदली रद्द — श्री. मधुकर मंडलिक
१९) श्री. गंगागीर महाराज — श्री. पु. कृ. वुपकर
२०) मी तुझे काय बिघडविले — प्रा. एच. बी. महाले
२१) साई भगवान — सौ. लीलाताई मराठे
२२) शिरडीवृत्त — जुलै १९८३

# संत चूडामणि श्रीसाईबाबा

स. म. वि. वि.




श्रीसाईबाबा हे स्वतः फकिरी बाण्याने व वैराग्यशील वृत्तीने वागत असत; परंतु तशा प्रकारची अपेक्षा ते इतरांकडून मात्र करीत नसत. त्यांचा आहार, रहाणे–सवरणे अत्यंत साधे असे. परंतु इतरांनीहि त्या वृत्तीचा अवलंब करावा असे त्यांना वाटत नसे. सर्वांकडून कठोर व तापसी वर्तन घडणे कठीण आहे याची त्यांना पूर्ण जाणीव होती; यामुळे तसा उपदेश ते कोणालाही करीत खाण्यावर व रहाणीवर बंधने का म्हणून घालावयाची? दंडन झाले पाहिजे मनाचे. अंतःप्रवृत्तींचे बाह्योपचारास कसले महत्त्व द्यावयाचे? आणि ते का म्हणून? मनुष्याचे मन, हृदय ही शुद्ध असली पाहिजेत. त्यांच्या शुद्धतेसाठी प्रत्येकाने जपावे असे ते सांगत असत. बाहेरचे वैराग्य किंवा शरीर–दंडन याला महत्त्व नाहीं.

या देहाच्या ज्या स्वाभाविक गरजा आहेत त्या भागविल्याच पाहिजेत. इच्छा आटोक्यात असाव्या. परंतु त्यांचा त्याग सर्वथा करू नये. 'कोणी भक्त उपवास करीत असत. केवळ उपवास काय कामाचा? शरीराला त्रास देण्या-पलिकडे त्याचा फारसा उपयोग नाहीं. उपवास करण्यापेक्षा जरूर करण्यासारख्या अशा इतर अनेक गोष्टी आहेत. त्यांच्याकडे कोण लक्ष पुरवित आहे? बाबा उपवासास उत्तेजन देत नसत. कामवासना आटोक्यात ठेवण्यासाठी झटा. त्या अग्नीत जळून भस्म होऊन जाऊ देऊ नका असे ते सांगत असत.

माणसाने व्यवस्थित व चांगले खाणे खावे. बाबांनी कोणाच्या जेवणा–खाण्यावर कधी निर्बंध घातला नाहीं. बाबा स्वतः एका हंडीत भोजन शिजवित असत. त्यात डाळ, तांदूळ, तूप, भाजीपाला व इतर मालमसाला घालून ती हंडी चांगली शिजवित असत. त्या हंडीतील मधूर प्रसाद ते सर्वांना वाटीत असत व प्रेमाने खाववित असत. कितीही पाहुणे भोजनास येवोत. त्या द्रौपदीच्या थाळीतील तो गोड प्रसाद कधी संपत नसे. तो सर्वांना पुरून उरत असे!

थोडक्यात सांगावयाचे म्हणजे श्रीसाईबाबांच्या निवासस्थानातील एकंदर वातावरण तामसी व कठोर नव्हते तर ते सुखदायक व आनंदकारी होते.

श्रीसाईबाबा दर्शन सुलभ होते. त्यांचे दर्शन कोणालाहि सहजरितीने घेता येत असे. आडकाठी कोणालाहि नसे. ते जास्त वेळ मशिदीबाहेर किंवा मशिदी-च्या आसपास कुठे तरी असत. मधून मधून सर्वसाधारण लोकांना समजतील असे दृष्टांत देऊन ते सभोवारच्या लोकांना बोधामृत पाजीत असत. अनेक रोगी व संकटग्रस्त लोक त्यांच्या दर्शनास येत असत. प्रत्येकाचे हृदगत समजून घेऊन परदुःख निवारण करण्यासाठी ते झटत असत. माणसाने सुखासमाधानात रहावे; दुःखी कष्टी राहू नये असे सांगून त्यासाठी आपल्याकडून शक्य असेल ते ते करीत असत.

परंतु त्यांना पराकाष्ठेचे दुःख होत असे ते एका गोष्टीचे. संसाराची दुःखे घेऊन हे सारे लोक माझ्याकडे येतात; रडतात; परंतु त्या आत्मारामाकडे कोणी वळत नाहीं. आत्मारामाचे वैभव किती आहे, त्याची ओळख पटवून घेऊन शाश्वत सुखाचा धनी कोणत्या मार्गाने व्हावे हे विचारायला मात्र माझ्या-कडे कोणी येत नाहीं. ते वैभवशाली जीवन मी देऊ शकतो परंतु त्याची ओढ कोणालाहि लागलेली दिसत नाही. सारी माणसे संसाराच्या जाळ्यात पूर्णपणे अडकून गेली आहेत.

आजच्या काळात ज्याला शिक्षण म्हणतात ते त्यांच्या वाट्याला आले नव्हते. त्यांनी शाळा, कॉलेजात प्रवेश करून पदव्या संपादन केल्या नव्हत्या. परंतु शास्त्रे, पुराणे, गीता, उपनिषदे, कुराण वगैरे सान्या धर्म ग्रंथासंबंधी त्यांचे ज्ञान आश्चर्य करण्यासारखे होते. श्रीसाई दरबारात कधी कधी मोठ-मोठे शास्त्रीपंडीत व विद्वान येत असत. ते त्यांचे ज्ञान पाहून आश्चर्याने थक्क होत असत. कोणता श्लोक कोणत्या ग्रंथात व कोणत्या अध्यायात आला आहे हे ते अचूक सांगत असत. एखादा कितीहि गहन असा अध्यात्मा संबंधी प्रश्न असला तरी त्याची उकल ते सहज रीतीने व कोणालाहि समजेल अशा रीतीने करीत असत.

साईबाबा कुठेही बसलेले असोत; त्यांच्यासमोर हा हां म्हणता मेळावा जमा होत असे. मग नाना वार्तालापांनी तेथील वातावरण भारावून जात असे. वातावरण कसे पवित्र व आनंदाने सदासर्वकाळ भरलेले असे. तेथे सुस्ती, आळस किंवा कंटाळा यांना सहसा थारा नसे. मधून मधून विनोदाचे फवारेही उडायचे. बाबांजवळ जायला कोणालाही भीति वाटत नसे.

कधी कधी बाबा क्रोधायमान होऊन अकाळ विक्राळ स्वरूपही धारण करीत असत. मग मात्र त्यांच्याजवळ जाण्याची कोणाचीहि तयारी नसे. त्यांच्या क्रोधाचे काहीं ना काहीं कारण असे ते नंतर उघडकीला येत असे. ते कोडे असे; परंतु ते तात्काळ उकलत असे. क्रोधाचा समय क्षणिक असे. नंतर त्याचा काहींएक मागमूस रहात नसे. पुनरपि बाबा खेळीमेळीने व प्रेमभावाने सर्वांशी वागत असत. बाबाचा क्रोधावेश म्हणजे एका निष्काम स्थितप्रज्ञाचा व योगेश्वराचा क्रोध. ती शंकराची रुद्रलीला. तिच्या पोटी भक्तांच्या कल्याणाची भावना दडलेली असावयाची.

साईबाबांच्या काळातील शिरडीचे वैभव काय सांगावे व काय वर्णावे! श्रीसाईबाबांच्या रूपाने स्वयं श्रीसच्चिदानंद प्रभूच तेथें वास्तव्य करीत होते. मग तेथे सुखसोहळयाला व आनंदाला कसला आला आहे तोटा! धन्य ते स्थान व धन्य ते तत्कालीन भाग्यवंत भक्त! त्यांनी बाबांच्या लीला प्रत्यक्ष पाहिल्या व अनुभविल्या!

— आणि आज? आजहि हजारो भक्तजन भक्तिभावाने व श्रद्धायुक्त अंतःकरणाने शिरडीत येतात, बाबांच्या समाधि स्थानाचे, श्रीसाई मंदिराचे व इतर पुण्यस्थानांचे दर्शन घेऊन पुण्यपावन होऊन जातात. आजहि साईबाबा आपल्या भक्तांच्या हाकेला पूर्वीप्रमाणे ओ देतात. त्यांना संकटमुक्त करतात व त्यांच्या मनोकामना पूर्ण करतात.

आणि समाधि घेतेवेळी बाबांनी आपल्या सर्व काळातील सर्व भक्तांना आश्वासन देऊन ठेविले आहे की —

शिरडीस ज्याचे लागतील पाय । टळती अपाय सर्व त्याचे ॥
माझ्या समाधीची पायरी चढेल । दुःख हे हरेल सर्व त्याचे ॥
जरी हे शरीर गेलो मी टाकून । तरी मी धावेन भक्तांसाठी ॥
नवसास माझी पावेल समाधी । धरा दृढ बुद्धि माझ्या ठायी ॥
नित्य मी जिवंत, जाणा हेचि सत्य । नित्य घ्या प्रचीत अनुभवे ॥
शरण मज आला, आणि वाया गेला । दाखवा दाखवा ऐसा कोणी ॥
जो जो मज भजे जैसा जैसा भावे । तैसा तैसा पावे मीही त्यासी ॥
तुमचा मी भार वाहीन सर्वथा । नव्हे हे अन्यथा वचन माझे ॥

आणि या गोष्टीची प्रचिती आजवर असंख्य लोकांस आलेली आहे व पुढेहि येत राहील! जो भक्त अंतःकरणापासून साईबाबांना हाक मारतो, त्याच्या हाकेला ते ओ दिल्याशिवाय रहात नाहीत. मात्र तुमच्या हाकेत सत्यनिष्ठा व आर्तता पाहिजे. ★

# संतांची पुण्यभूमी

–श्री. विजय यशवंत सहामते
मु. पो. चिंचणी, ता. डहाणू
जि. ठाणे – ४०१ ५०३

० रामायण महाभारतापासून आपण ऋषिमुनींचे व संतांचे वास्तव्य भारतात ऐकत आलो आहोत. त्यापासून आपली संस्कृती निपजली व आज सबंध राष्ट्रात भारतीय संस्कृती एकमेव ठरली आहे. त्याचे सर्वश्री श्रेय संताना व ऋषि-मुनींनाच द्यायला हवे.

संतांच्या आगमनाने आम्हां भारतीयांना चांगल्या संस्कृतीची देणगी मिळून प्रत्येक व्यक्तिच्या व्यक्तीमत्त्वाला व राष्ट्राच्या विकासाला चालना मिळून राष्ट्राचे दैदिप्यमान स्थान व व्यक्तीचे जीवन सुखी झाले आहे.

भारत छोडो ह्या चळवळीने ब्रिटिशांना आपण हादरून सोडले आणि आपल्या भारत मातेला स्वतंत्र केले. पारतंत्र्याच्या शृंखला झुगारून नवीन जोमाने व नवीन उत्साहाने कामास लागावयाचे होते. परंतु धूर्त ब्रिटिशांनी आपले काही बांधव आपणापासून कायमचे दूर केले. परंतु भूतलावर दुष्टांचा संहार करण्यासाठी परमेश्वरास कधी तरी अवतार घ्यावा लागतो, तद्वतच आपल्याला मिळालेला हा संतांचा वारसा परमेश्वराने पूर्णपणे दूरदृष्टीचा विचार करूनच दिलेला असला पाहिजे.

महाराष्ट्रातील ज्ञानेश्वर, तुकाराम, सोपानदेव, कबीर, एकनाथ महाराज, मुक्ताबाई, मीरा इ. संतांनी गावोगावी फिरून आपल्या ज्ञानाने लोकांमधील अंधश्रद्धा, वाईट चालीरिती, माणसाची कु–कर्तव्ये इ. चा बीमोड करून आपल्याला चांगल्या मार्गाला लावले, मनाचे श्लोक, रामरक्षा, ज्ञानेश्वरी, रामायण महाभारतातील कथा, श्रीकृष्णार्जुन कुरुक्षेत्र संवाद इ. चे ज्ञान भांडार आम्हांपुढे ठेऊन आमच्या यशस्वी जीवनाची वाट आज पूर्णपणे सुलभ करून दिली आहे. आम्ही संतांनी केलेले उपकार कधीच विसरू शकत नाही.

हिंदू–मुस्लिम ऐक्य साधण्यासाठीच श्री साईनाथांनी शिरडी सारख्या खेड्यात आपले वास्तव्य केले. धन्य ते शीलधी (शिरडी) व तेथील प्रजाजन. त्यांच्या पूर्वपुण्याईमुळेच श्री साईनाथांसारख्या परम पुण्यवान संतांचे पाय त्यांच्या पुण्य भूमीत अवतरले, व आज बाबांच्या शिरडीचा सगळ्या ठिकाणी

उदो–उदो होत आहे. आपल्या भारतात कितीतरी ठिकाणे आहेत की जेथे संतांचे आगमन झाले व त्यांच्यापासून आपणास पुष्कळ शिकायचे आहे, फक्त मनात श्रद्धा व सबूरीची जोड हवी. आज शिरडीचे महात्म्य दिवसेंदिवस वाढत आहे व ती साईनाथांची शिरडी ओळखली जाऊ लागली आहे. तेथील बाबांचे भव्य मंदिर व मूर्ती, द्वारकामाई आपल्या हृदयाचा ठाव घेत आहेत व मुंग्या-प्रमाणे लोकांचा थवा शिरडीस जाऊ लागला आहे. अशा ह्या पवित्र शिरडीचे बाबांनी नंदनवन केले व बाबांच्या पवित्र स्पर्शाने तिथली माती न् माती निर्मळ होऊन सगळ्या ठिकाणी आपल्याला बाबांचा साक्षात्कार घडतो. बाबांच्या ह्या प्रांतात सर्व जाती–पंथ व धर्माचे लोक येतात आणि बाबांच्या दर्शनाने आपले जीवन धन्य करून घेतात. शिरडीवरून परतताना ज्याप्रमाणे एखाद्या स्त्रीला आपले माहेर सोडताना दुःख होते त्याहीपेक्षा जास्त दुःख शिरडी सोड-ताना होते.

आपल्या महाराष्ट्रात तशी बरीचशी पवित्र व धार्मिक स्थळे असून संतांच्या पद–स्पर्शाने ती ती स्थळे पावन झाली आहेत. समर्थ रामदास स्वामींचा सज्जन-गड, अक्कल कोट, गाडगे महाराज, गजानन महाराज व सद्‌गुरु झोलेबाबा इ. संतांनी आपल्या भक्तांची दुःखे व संकटे आपणाकडे घेऊन चमत्कारा द्वारा प्रजाजनांना माणुसकी, श्रद्धा, सबूरी भुकेलेल्याला अन्न आणि संसारात राहून प्रपंच कसा करावा ह्याची शिकवण दिली, अशा ह्या संतांच्या पुण्यभूमीचे वर्णन करावे तितके थोडेच आहे. आम्ही भारतीय ह्याबाबतीत सुदैवी असून संतांच्या अभय आशिर्वादाने आमची संस्कृती आजपर्यंत टिकून राहिली असून आमच्या संस्कृतीची उत्तरोत्तर प्रगति होत राहून तिला नव्या आचार–विचारांची कीड न लागो हीच श्रीसाईनाथ चरणी प्रार्थना.

**साई स्मरा, साई भजा, साई आठवा, साई नाम बोला**
**ध्यानी साई, मनी साई, हृदयी साई, साई मुखे बोला**

---

## नांदा सौख्यभरे

गिरगावातील साईधाम मंदिरात सतत २५ वर्ष सेवा करणारे एक साई-भक्त (अ जचे उपाध्यक्ष) श्री. नामदेव अनंतराव हटाळकर यांचे पुत्र चि. दिपक यांचा विवाह चि. सौ. कां. कल्पना जयवंत गंद्रे हिजबरोबर चंदारामजी गर्ल्स हायस्कूल मुंबई येथे १४–५–८३ रोजी सायंकाळी ४–१५ चे मुहूर्तावर थाटाने साजरा करण्यात आला. वधूवरांचे हार्दिक अभिनंदन.

# श्रीसाई सहवासातील भक्त संत-श्री गंगागीर महाराज

—श्री. पु. कृ. धुपकर.
२१७—६ जवाहरनगर,
गोरेगाव, मुंबई—६२.

० नाथ पंथात गिरी, पुरी, भारती वगैरे ज्या शाखा आहेत त्यापैकी संत श्री. गंगागीर महाराज गिरी पंथाचे होते. यामुळेच त्यांना गंगागीर म्हणत. नाथपंथी गोसावी संसारी असतात व ते भिक्षा मागून उदर निर्वाह करत असतात. त्यानुसार श्रीसंत गंगागीर महाराजांच्या वडिलांनी त्यांच्या बाळपणीच त्यांना भिक्षा मागण्याची दीक्षा दिली होती. कारण शंभर वर्षापूर्वी खेड्या-पाड्यातून शिक्षणासंबंधी भलतेच गैरसमज असल्याने त्यांना शाळेचे दर्शन घडले नव्हते. परंतु परमेश्वराची त्यांच्यावर कृपा होती. जन्मतः हाड मजबूत! भरपूर सहा फूट उंची मनाच्या ठिकाणी पावित्र्याची उपजतच देणगी! बाळ-पणापासून त्यांना कुस्तीची विशेष आवड होती. त्यांच्या वडिलांनाही कुस्तीचा नाद असल्यामुळे त्यांनी ह्याबाबतीत मुलांकडे विशेष लक्ष पुरविले होते. त्यामुळें अल्पकाळातच गंगागीर महाराज हे नगर जिल्ह्यात प्रसिद्ध पहिलवान म्हणून ओळखले जाऊ लागले. कुस्ती खेळायला लागल्यापासून अपयश माहित नव्हते. त्यांच्या कुस्तीचा निर्णय जणू आगाऊच ठरलेला असायचा! परंतु परमेश्वरी संकेत निराळाच असतो.

एका प्रसंगी अगदीच सामान्य पहिलवानाने गंगागीर महाराजांना अपयशाचा रस्ता दाखविला. यशवंत मनुष्यास अपयश हे मरणासमान भासते. कुस्ती संपली, ती संपताच गंगागीर महाराजांनी आपला लंगोट सोडला व यशस्वी पहिलवाना-च्या अंगावर फेकला. प्रतिपक्षाच्या अंगावर आपला लंगोट टाकणे म्हणजे त्या क्षणापासून कुस्तीला रामराम ठोकल्याची खुण पहिलवान संप्रदायात पूर्वापार अशी पद्धत सुरू आहे.

गंगागीर बाबा घरी आले. तालमीचा दरवाजा त्यांनी सोडला व ते विठ्ठल मंदिराच्या दारात शिरले. त्या दिवसापासून ते भजन करू लागले. पूर्वी नाथ-पंथात अनेक भक्त होऊन गेले. त्याप्रमाणे ह्यांच्या घराण्यातही एखादा भक्त झाला असेल. त्याची ती पुण्याई वारसाहक्काने ह्यांना मार्ग दाखविण्यास कारणीभूत झाली. कारण गंगागीर महाराज दिवसेंदिवस भक्तिमार्गात वाढती प्रगति करत चालले. महाराष्ट्र ही भागवत धर्मीय संतांची भूमी ह्या भूमीने

आजवर अनेक संतांना जन्म दिला. त्यांचा किर्तीध्वज सतत फडकत राहिल अशी राष्ट्रोद्धाराची व धर्मप्रसाराची कर्तबगारी त्यांचेकडून करुन घेतली. अशा त्या श्रेष्ठ संप्रदायाचे अनुदायित्व श्रीसंत गंगागीरमहाराजांनी स्वीकारले. त्यांनी नामस्मरणाचा गडगडाट भोळ्याभाविकात सुरू केला. श्रीगंगागीर महाराज भजनास उभे राहिले तर सतत आठ आठ तास उभे रहात. निस्सीम परमेश्वर भक्ति, सत्याचरण, निरहंकारवृत्ती, परोपकार, निःस्वार्थता व नैष्टिक ब्रम्हचर्य ह्यामुळे समाज त्यांच्याकडे आकर्षिला गेला. नगर, नाशिक, औरंगाबाद ह्या जिल्ह्यात त्यांनी मोठमोठे नामसप्ताह केले. लाखो लोकांस अन्नदान करुन त्यांच्यात परमेश्वरभक्तीचा प्रसार केला. शेवटपर्यंत ते श्रीसाईबाबांच्या अलौकिक साधुत्वाचा प्रत्येक ठिकाणी व नामसप्ताहात मोठ्या गौरवाने उल्लेख करीत.

श्रीसाईबाबांनी आपल्या तपश्चर्येच्या स्थानाजवळील जागा साफ केली त्या ठिकाणी त्यांनी फुलझाडे लावली. त्याझाडांची सर्वप्रकारे निगा राखण्याची कामे ते स्वतः करीत. एका प्रसंगी संत गंगागीर महाराज शिर्डी येथे आले. त्यावेळी श्रीसाई महाराज दोन्ही हातात खापराच्या घागरी घेऊन झाडांना पाणी घालीत होते. अशावेळी उभयतांची भेट झाली. त्यावेळी परस्पर परस्परांकडे आत्मीयतेच्या भावनेने पाहू लागले. भेटीचे गूढ ते दोघेही आपल्या नजरेने ओळखू लागले. आत्मिक दृष्टीच्या भावनेने दोघांनी परस्परांची थोरवी जाणून घेतली. नंतर तोंडातून एक शब्दही न काढता दोघे आपापल्या मार्गाने निघुन गेले. त्या दोन महात्म्यांच्या भेटीचे खरे महत्व कोणत्याही संसारी जीवास समजणे अशक्य! कारण श्रेष्ठ भक्तांची योग्यता ओळखण्यास दुसरा भक्तही तसल्याच योग्यतेचा असावा लागतो. संसारी मनुष्य असल्या महात्म्याजवळ जन्मभर राहिला तरी त्याला त्याच्या दैवी शक्तीची कल्पना येणे शक्य नाही.

नंतर श्रीगंगागीर महाराज शिर्डी गावात गेले. त्यावेळी गावातील कै. तात्या कोते पाटील वगैरे प्रमुख मंडळी परगावी गेलेली होती. ह्यामुळे श्री. गंगागीर महाराज 'रुई' ह्या शेजारच्या गावी निघून गेले. असला महान भक्त आपल्या गावी आला असता आपली भेट होऊ नये ह्याची गावातील पुढारी मंडळीस हळहळ वाटू लागली. दुसऱ्याच दिवशी कै. तात्या कोते पाटील कै. गणपतराव गायके, कै. दाजिबा पाटील कोते वगैरे मंडळी 'रुई' गावी जाऊन गंगागीर महाराजांची त्यांनी भेट घेतली. व सर्वांनी महाराजांना विनंती केली की "आमचे गावी नामसप्ताह करावा" त्यासाठी आम्ही वीस पोती गहू देतो. इतर लोकही आपापल्या शक्तीनुसार मदत करतीलच. आपण यावेच आपला शब्द घेतल्याशिवाय आम्ही येथून जाणार नाही.

विठ्ठलभक्त गंगागीर महाराज त्यांना म्हणाले, "तुमच्या गावी आता नामसप्ताहाची मुळीच गरज नाही. कारण आता शिर्डी हे गाव पूर्वीचे राहिले नाही. लवकरच तुमच्या गावाला प्रसिद्ध क्षेत्राचे महत्त्व प्राप्त होणार आहे." "भवितव्यता आपल्या पोटातील गूढ गोष्टींचा थांग प्रत्यक्ष भविष्यालासुद्धा लागू देत नाही. परंतु संत महात्मे आपल्या अंतदृष्टीने तिच्या हृदयातल्या अत्यंत महत्त्वाच्या गोष्टी जाणू शकतात."

संत गंगागीर महाराज म्हणाले "तुमच्या शिर्डी गावात जो साधुपुरुष आहे त्याच्या आगमनाने, तपश्चर्येने व वास्तव्याने तुमच्या गावाचे मूळ रूप पूर्णत: पालटणार. कारण तो अतिश्रेष्ठ असा महात्मा असून अवतारी पुरुष आहे. त्याच्या होणाऱ्या वास्तव्याने शिर्डी ही पुण्यभूमी म्हणून गणली जाणार. त्याच्या चरणाने पवित्र झालेली धुळ मस्तकी धारण करण्यासाठी देशोदेशींच्या भाविकांच्या झुंडीच्या झुंडी तेथे लोटतील. शिर्डीचे हे भाग्य देशचे देश व्यापून टाकील. शिर्डी क्षेत्राच्या वास्तव्याने अनेकांच्या पापराशि जळून खाक होतील. ते पुण्यवान ठरतील धार्मिकांच्या मनःकामना पूर्ण होतील. शिर्डीकरांच्या अनेक पूर्वजांची पुण्याई फळास आली म्हणून हा महात्मा शिर्डीस आला."

संत गंगागीर महाराजांच्या ह्या बोलण्याचा शिर्डीकरांवर फार परिणाम झाला, व त्यांना जास्त आग्रह न करता ते परत गावी आले. संत गंगागीर महाराजांची भविष्यवाणी शिर्डी येथे आज सत्यस्वरूपात दिसून येत आहे.

संत गंगागीर महाराजांच्या उपदेशाचा शिर्डी गावावर चांगलाच परिणाम झाला. गावातील लोक श्रीबाबांकडे आदराच्या भावनेने पाहू लागले. हा कोणी अवतारी पुरुष असला पाहिजे ही त्यांची भावना बळावू लागली. काही दिवसां-नंतर श्री गंगागीर महाराजांनी शिर्डीकरांच्या आग्रहास्तव, नामसप्ताह करण्यास मान्यता दिली. शिर्डीकरांनी मोठ्या प्रमाणात नामसप्ताह केला. शेवटच्या दिवशी आसपासच्या गावातून हजारोंनी मंडळी आली. श्रीगंगागीर महाराजांनी त्यांच्या हृदयात श्रीसाई महाराजांविषयी आदरभाव निर्माण केला. नामसप्ताहाच्या शेवटल्या दिवशी आलेल्या सर्वांना शिर्डीकरांनी अन्नदान केले व नामसप्ताहाची सांगता केली. नंतर श्रीसाईबाबांच्या पूर्वदिनक्रमात बराच फरक झाल्याचे दिसू लागले. भेटीस येणाऱ्या भक्तांशी बोलणे, त्यांच्या प्रश्नांची उत्तरे अगदी मोजक्या परंतु परिणामकारक शब्दात देणे. भिक्षेसाठी स्वतः पाच घरी जाणे व इतरही बाह्य गोष्टीत अल्पसे लक्ष घालणे हे प्रकार सुरू झाले. त्यामुळे समाज वाढत्या प्रमाणावर त्यांच्या भोवती जमा होऊ लागला. ☆

# श्रीबाबांनी मला मोहित केले

–श्री. पी. एन्. भास्करे
शिक्षक निवास, मु. पो. माळीनगर
जि. सोलापूर

० आज मानवप्राणी दैनंदिन जीवनातील अनेक घडामोडींनी अगदी त्रस्त होऊन गेला आहे. आर्थिक, सामाजिक, कौटुंबिक अशा विविध स्तरावरील अनेक अप्रिय घडामोडींमुळे मानवाला जीवन जगणे असह्य झाले आहे. सामाजिक व नैतिक मूल्यांचे अवमूल्यन झाले आहे. दैनंदिन जीवनात असा कोणताही आशेचा किरण पहावयास मिळत नाहीं की ज्याच्या आधारे आपण पुढील वाटचाल करण्याची उमेद बाळगावी.

अशा या निराशाजनक जीवनप्रवाहातील जर कोणता आशेचा आधार असेल तर तो म्हणजे शिर्डीवरील श्रद्धा की जी आजहि अनेकांच्या बाबत फलद्रूप होत आहे. दिव्य चमत्काररूपी संदेश देऊन हे असह्य जीवन सुसह्य करण्याचे दिव्य कार्य बाबा करीत आहेत. आणि हे, मी सांगतो म्हणून नव्हे तर याचा लाखोंनी अनुभव अनुभवला आहे व तो यापूर्वी श्री साईलीलामधून प्रकट केला आहे व भेटीअंती एकमेकांना समक्ष व्यक्त केला आहे. मीही या सुखद अनुभूतींचा आस्वाद घेतला आहे. परंतु एवढ्यात मन कबूल होत नव्हते कारण वाटत असे की कदाचित तो योगायोग असावा. परंतु प्रसंगाच्या अनुभूती-मध्ये सातत्य येऊ लागल्यानंतर मात्र खंबीरपणे श्रीबाबांच्या दिव्यत्वाचा स्वीकार करणे झाले.

तो दिवस मोठा विलक्षण म्हणावा लागेल ज्या दिवशी बाबांनी मला त्यांच्या दिव्य चमत्काररूपी अनुभूतींच्या पर्वातील प्रथम पानाची ओळख करून दिली. प्रसंग असा होता की, 'चार वर्षापूर्वीचा दिवाळीचा सण. शिप्याचेकडील प्रचंड गर्दीमुळे मुलांना कपडे घेण्यासाठी रेडीमेड कपड्यांच्या दुकानात गेलो होतो. कपड्यांची खरेदी झाल्यानंतर दुकानदाराने गुंडाळी करून ठेवलेल्या अनेक कॅलेंडरपैकी एक कॅलेंडरची गुंडाळी माझेपुढे केली. मी त्यांची साभार माफी मागून "मला कॅलेंडरमध्ये रस नसल्याचे सांगितले. त्यांनी फारच आग्रह केला तेव्हां मी म्हणालो, "मग त्यातील एखादे देवादिकांपैकी असेल ते द्या.

त्यावर ते म्हणाले, "देवापैकी नाहीं, हे असू द्या म्हणून त्यांनी ते पिशवीत ठेवले. व म्हणाले तुम्हांला नको असेल तर तुमच्या मित्रमंडळीपैकी कोणाला तरी द्या. झाले, आम्ही घरी आलो व मुलांनी ती कॅलेंडरची गुंडाळी ताबडतोब सोडून पाहिली व साईबाबा–साईबाबा म्हणून ओरडू लागले. मलाहि मोठे सुखद आश्चर्य वाटले. ते ह्याबद्दल की इतक्या त्या सर्व नटनट्यांच्या कॅलेंडर-मधून आपल्या वाट्यास दुकानदार देवाचे कॅलेंडर नाहीं म्हणत असतांना नेमके श्री साईबाबांचे कॅलेंडर यावे हा मोठा योगच म्हटला पाहिजे. बाबांचा तो आशिर्वाद स्थितीतील फोटो सर्वांना फारच आवडला व हा एक शुभ योगायोग म्हणून आम्ही ते कॅलेंडर घरात लावले.

पुढे दोन तीन दिवसानंतरचा प्रसंग मी नववीच्या वर्गात शिकवित होतो. वर्गात शिकवित असता एक मुलगी दुर्लक्ष करून इतर पुस्तक वाचत असल्याचे निदर्शनास आल्यावरून तिला उभे केले व पुस्तक टेबलावर आणून ठेवण्यास सांगितले. मुलगी घाबरत घाबरत टेबलाजवळ आली व पुस्तक टेबलावर ठेवले व रडू लागली व पुन्हां दुर्लक्ष करणार नाहीं असे म्हणू लागली. एवढ्यात माझे लक्ष त्या टेबलावरील पुस्तकाकडे गेले. पहातो तो काय पुस्तकावर श्रीबाबांचा आशिर्वाद स्थितीतील फोटो व पुस्तक श्रीसाईचरीत्राचे होते. मी मुलीस म्हणालो "रडू नकोस. मी पुस्तक तुला परत देईन. मला ते वाचण्यासाठी दोन दिवस हवे आहे" मुलगी ही थोडी समाधानात परत गेली व मलाहि दुसरा सुखद आश्चर्याचा धक्का बसला.

पुढे ह्या प्रसंगानंतर दहा ते पंधरा दिवसांनी आमचे माळीनगर येथील भजनी मंडळातील एक वयस्कर गृहस्थ श्री चव्हाण नाना माझेकडे आले व मला म्हणाले, "सर, तुमच्यासाठी एक निरोप आणला आहे" मी म्हणालो, "कसला निरोप?" त्यावर ते म्हणाले "तुम्हांला २२ जुलै रोजी, गुरुपौर्णिमेच्या उत्सवास बाबांनी शिर्डीस बोलाविले आहे." हे ऐकताच मात्र मी पुन्हां कोड्यात पडलो. डोक्यात विचार सुरू झाले, ते कॅलेंडर! ते पुस्तक! आणि आता तर काहीएक संदर्भ नसता प्रत्यक्ष निरोप! काही कळेना. परंतु मनाने निग्रह केला की आता शिर्डीस गेले पाहिजे. कारण ह्या तीन प्रसंगातून बाबांनी मला त्यांच्याकडे चांगलेच खेचून घेतले होते. माझेबरोबर शिर्डीस येण्याचे आमचे येथील श्री. साबडेसरांनी कबूल केले. सकाळी सहा वाजता घरातून बाहेर पडलो वाटेतच श्री साबडेसरांचे वडील भेटले. ते माझीच वाट पहात असावे मला म्हणाले आमच्या सतीशचे तूर्त रद्द झाले आहे. तेव्हां हे अकरा रुपये द्या व

तुम्हीच आमचा अभिषेक करा. मला सुरुवातीस वाईट वाटले परंतु मनात विचार केला की हाहि काहीतरी सूचक संकेत असावा. कदाचित बाबांनी मला एकट्यास येण्यास सुचविले असावे माळीनगर श्रीरामपूर गाडीत बसून निघालो, गाडी अकलूज स्टॅंडवर येताच एक फकीर गाडीच्या दिशेने येत असलेला पाहिला आणि तो आला तो थेट माझ्या खिडकीकडेच. हातातील कटोरी माझेकडे करीत माझेकडे एक नेत्रकटाक्ष टाकला. काही बोलला नाही. मी त्याच्या कटोरीत दक्षिणा टाकताच इतर कोणालाही न मागता तो परत निघून गेला. आता गाडी दौंड स्टॅंडवर आली होती. कण्डक्टरने सांगितले की गाडी उतारूंना चहापान करण्यासाठी १० ते १५ मिनिटचें थांबेल. सर्व उतारू झटपट गाडीतून उतरले. आता गाडीत आम्ही दोघेचौघेजण शिल्लक राहिलो होतो. तेवढ्यात एक नाथसंप्रदायातील याचक हातात त्रिशूळ घेऊन गाडीत आला. विपुल जटा-संभार, भगवी वस्त्रे अशा स्थितीत तो गाडीत त्रिशूळ आपटीत येरझाऱ्या घालू लागला तो बडबडत होता, "इस गाडीमें है कोई साईबाबाका चेला? अगर है तो दिखादे अपनी भक्ती!" या वाक्याबरोबर मी मात्र चक्रावून गेलो. कारण बाबा सतत जाणीवपूर्वक मला त्यांच्याकडे खेचून घेत होते. गाडीतील इतर दोघे त्याच्याकडे थोड्याशा कुचेष्टेने पहात होते. हे सर्व मी चूपचाप बसून पहात होतो. तेवढ्यात तो पुढे म्हणाला, "इस गाडीमें एक साईबाबाका चेला है और वो शिर्डी चला है। तो दिखादे अपनी भक्ती । मी त्याचे टोकरीत दक्षिणा टाकताच तोहि न थांबता निघून गेला. आता ह्या सर्व प्रकारामुळे मला केव्हां एकदा बाबांचे दर्शन होते असे झाले होते.

शिर्डीस पोंहचताच सर्वप्रथम मंदिरात जाऊन दर्शन घेतले. नेत्र अश्रूंनी भरून आले. समाधान वाटले. शिर्डीने जणू पंढरीचें रूप धारण केले होते. भाविकांच्या चेहऱ्यावरहि भक्तिभाव ओसंडत होता. लोकांच्या बोलण्यातुन 'अभिषेक तिकिट विक्री' पहाटे सुरू असल्याचे समजले. विचार आला की गुरुपौर्णिमेचा अभिषेक योग घडून आल्यास परमभाग्य! पहाटे दीडदोन वाजता आपोआप जाग आली. स्नान वगैरे कार्यक्रम पार पडला व तिकिटाच्या रांगेत येऊन उभा राहिलो. माझे पुढे पाचदहा मंडळी रांगेत होती. तिकिटहि मिळाले व गाभाऱ्यात आलो. समाधिवर बसून अभिषेक लाभ झाला. लोक बोलत होते गुरुपौर्णिमेच्या अफाट गर्दीत हा लाभ फारच दुर्मिळ असतो. मनाला फारच समाधान वाटले. अशा प्रकारे बाबांचे गोड दर्शनाचा व अभिषेकाचा सोहळा पार पडल्यानंतर ठरविले की बाबांची अल्प अशी सेवा बांधून घ्यावी. वर्षभर

साईचरणी प्रसाद व उदीसाठी दहा रुपये महिना पाठविण्याचा संकल्प सोडला परंतु कालगतिनुसार एक वर्षानंतर मी फारच आजारी पडलो. पुणे, मुंबई, मिरज, सांगली या ठिकाणी औषधोपचारासाठी जाऊन आलो. परंतु निदान होईना व नेमका आजार कोणता हेच कळेना. अशक्तपणा मात्र वाढतच चालला शरीर साथ देईना. नेहमी त्रस्त मनःस्थितीत काळ जाऊ लागला. असेच एकदा मनात साईबाबांना त्रासलेल्या मनःस्थितीत हवालदिल होऊन आळवित असता माझे घरी एक मुलगी आली व म्हणाली, 'सर, माझ्या बहिणीने प्रसाद दिला आहे." मी विचारले, "प्रसाद? कोणत्या ठिकाणचा?" ती म्हणाली "शिर्डीचा" गुरुवारचा दिवस व शिर्डीचा प्रसाद, ही मोठी समाधानाची घटना वाटली. मी दुसरे दिवशी अमावस्येची दर महिन्याची वारी करण्यासाठी वडवळला गेलो. श्री वटसिद्ध नागनाथ महाराजांचे दर्शन घेऊन सायंकाळी घरी आलो. घरी आल्या आल्या मिसेसनी विचारले, "अहो तुम्ही तो शिर्डीचा प्रसाद खाल्ला का?" मी "होय" म्हणालो. मिसेस म्हणाली, "अहो शेजारच्या फडणीस बाईंनी सांगितले आहे की, बोराटे बाईंच्या स्वप्नात बाबांनी काल बुधवारी रात्री असे सांगितले की, तू महिन्यापूर्वी शिर्डीस येऊन माझा प्रसाद घेऊन गेलीस आणि तो प्रसाद खुंटीस अडकवून ठेवला आहेस. तिकडे माझा सेवक, भास्करेसर आजारी असून त्याला तू प्रसाद का दिला नाहीस. उद्या तो नेऊन दे. आणि बाबांच्या सूचनेनुसार त्या बाईंनी प्रसाद पाठविला आहे. अर्थात त्या दिवसापासून माझ्या तब्येतीस आराम पडू लागला व तब्येत आपोआपच सुधारू लागली. अशा एक ना अनेक चमत्कारांनी बाबांनी मोहित केल्यावर मी बाबांच्या प्रतिमा मित्रमंडळींना भेट देण्याच्या सेवेचा संकल्प सोडला. मी भेट दिलेला फोटो मित्रमंडळी आवडीने खिशात ठेवू लागली. फोटो त्यांचे जवळ आल्यापासून त्यानांहि काही अनुभव येऊ लागले. त्यातील एका शिक्षकांनी त्यांचा प्रत्यक्ष अनुभवलेला प्रकार सांगितला. दोन शिक्षक श्री. भांदुर्गे व श्री. वारवकर बुलेटवर बसून गावी जात असता त्यांना रस्त्यात एक मुलगी आडवी आली व त्यांच्या गाडीच्या धक्क्याने ती हवेत जवळ जवळ ५० फूट फेकली गेली. तिने जमिनीवर पडताच काही एक हालचाल केली नाही. सर्वांना वाटले ती खलास झाली. लोकांनी आरडाओरडा करून त्या दोघांचा पाठलाग सुरू केला. बुलेट चालविणाऱ्या शिक्षकाचा पळून जाण्याचा विचार होता. परंतु पाठीमागे बसलेल्या शिक्षकाने त्यांना तसे न करण्याबद्दल सल्ला दिला. त्यांनी खिशातील बाबांचा फोटो बाहेर काढून नमस्कार केला व याचना केली की बाबा या गंभीर प्रसंगातून आम्हांला वाचवा. तेवढ्या अवधीमध्ये इकडे त्या

मुलीच्या तोंडावर पाणी शिंपडून तिच्या तोंडातहि थोडे पाणी ओतण्याचा प्रयत्न झाला होता. आणि काय आश्चर्य ती मुलगी जणू काही घडलेच नाहीं अशा अविर्भावात उठून उभी राहिली व फरॉक झटकत बाजूला निघून गेली. तिला थोडे देखील खरचटले नव्हते. याचेही सर्वांना आश्चर्य वाटले. हा प्रसंग आठवला की त्या दोघा शिक्षकांच्या अंगावर शहारे येतात. ते वारंवार मला म्हणतात की तुमच्या बाबांनी आम्हांला अतिशय गंभीर प्रसंगातून वाचविले. नाहीतर काही खरे नव्हते. असे एक ना अनेक दाखले बाबांनी दिले आहेत.

परवाचीच गोष्ट घ्या भारत विरुद्ध वेस्टइंडिज यांच्यामधील प्रुडेंशियल वर्ल्डकप क्रिकेटचा अंतिम सामना, भारताची केवळ १८३ धावात दयनीय अवस्था झालेली. आम्ही बरेच शिक्षक मैदानावर बसून रात्री ११ चे दरम्यान रेडिओ-वरील कॉमेंट्री ऐकत होतो. मी म्हणालो बाबांनी एवढी इच्छा मान्य करून भारताचा विजय घडवून आणावा. तसे झाले तर मी शिर्डीस दहा रुपयांची मनिऑर्डर प्रसादासाठी पाठवीन. सर्वांना ते अशक्य वाटले कारण वेस्टइंडिज सारख्या बलाढ्य संघास १८३ धावा करणे काहीच अवघड नव्हते. व त्यांच्या रिचर्डसने चौकारांची आतषबाजी सुरू करून ते दाखवून देण्यास सुरवात केलीही होती. परंतु माझे मन मला सांगत होते की पृथ्वीच्या पाठीवरील कोणतीहि अशक्य घटना बाबा सहज शक्य करू शकतात. आणि खरोखरच त्यावेळी वेस्टइंडिजचे खंदे वीर एका पाठोपाठ बाद होऊ लागले. व भारताच्या विजयाचा सुखद धक्का आम्हां शिक्षकां बरोबरच सर्व भारतीयांना बसला. खरोखर बाबांच्या सामर्थ्याच्या कल्पना करताच येत नाहींत तुम्ही करुणा भाकलाच ते तुमच्यासाठी धावून आलेच म्हणून समजा.

बाबांनी कित्येकांच्या अशक्यप्राय शारिरीक व्याधि औषधपाण्याशिवाय बऱ्या करून आधुनिक वैद्यकीय क्षेत्रात काम करणाऱ्या तज्ञ डॉक्टरांना कोड्यात टाकले आहे. कुणाला आर्थिक तर कुणाला मानसिक व्याधितून मुक्त केले आहे. परंतु हे सर्व श्रद्धा व सबुरी असेल तरच अनुभवता येईल. श्री. बाबांचे चरणी निर्मळ श्रद्धा व तेवढ्याच तोलामोलाची सबुरी ठेवली की आपल्याला या भव-सागरातून तरुन जाणे कठीण नाहीं. श्री बाबांच्या आशिर्वादाने सर्व मानव-जातीचे कल्याण होवो. हीच श्री बाबांचे चरणी नम्र प्रार्थना.

# दाता दातृत्व आणि दान

—श्री. र. श्री. पुजारी.
'रमा निवास' ९९२ सदाशिव पेठ, पुणे–३०.

* आपण केलेल्या संचयातील काही अंश इतराना देऊन टाकणारा तो दाता. देऊन टाकण्याचे मनाचे उदारपण हे दातृत्व. जे देऊन टाकले ते दान, देणगी किंवा मदत.

केलेला संचय अन्न–वस्त्र, धन–धान्य, विद्या–कला या स्वरूपाचा असू शकेल.

जे दान केले ते कोणत्या अपेक्षेने, कोणत्या भावनेने, कोणत्या प्रतीचे असे तीन प्रमुख प्रश्न येथे निर्माण होतात. जे दिले ते स्वार्थापोटी की प्रेमाने, मोकळेपणी की हात राखून, उत्कृष्ट की निकृष्ट ही त्या प्रश्नांची नेमकी उत्तरे असतात.

सात्त्विक मनुष्य संचयाचा लाभ इतरांना मुक्तपणे देतो. राजस मनुष्य संचयाचा पुरेपूर उपभोग घेऊन उरलेला अंश 'मुखी' पडावा या भावनेने वाटून टाकतो. तामस मनुष्य आळस आणि व्यसन यामुळे संचय खलास करून टाकतो.

ओझ्यामुळे होडी बुडू नये म्हणून संचिताचा तेवढाच भाग गंगार्पण करून टाकणाराही एक वर्ग असतो. तर संचय अबाधित रहावा या हेतूने एखादा बंगाली जमिनदार आपल्या भातशेतीच्या बांधाना एखाद्या संताच्या सल्ल्यावरून भोकेही पाडून ठेवतो.

संचयाचा विनियोग मनुष्यप्राणी अशा रीतीने आपल्या सात्त्विक, राजस, तामस किंवा संमिश्र वृतीच्या आश्रयाने करीत असतो. तरीही या संचयाचा मूळ कर्ता कोण, हे संचयकर्म तो का करीत असतो, विनिमयाची व्यवस्था तो माणसांकडेच का देतो हे प्रश्न अनुत्तरीतच राहातात.

ती उत्तरे सात्त्विक मनुष्य चिंतनामुळे शोधून काढतो.

या कर्तृत्वाचा कर्ता ईश्वर. मानवी कल्याणासाठी हे कर्म तो करतो. विनिमयाचे म्हणजे वाटपाचे काम योजनापूर्वक तो माणसाकडेच देतो.

या व्यवहारामुळे मानवामानवामधील बंधुभाव वाढावा अशी त्याची इच्छा असते.

माणसे फळझाडे लावू शकतात. विज्ञानबुद्धीमुळे मशागतही पूर्ण शास्त्रीय दृष्टीकोनांतून करू शकतात. पण फळ उत्तम स्थितीत हाती येईलच याची खात्री देऊ शकत नाहीत.

येथेच कर्मामागील ईश्वरी सत्तेचा प्रत्यय येतो. चैतन्यरूप ईश्वरी सत्ताच सर्व काही करते हे पटते. मी नोकर नव्हे, मी मालक हा गर्वही क्षणात उतरतो मी दाता, दानी, दानशूर या मोठेपणाचे पितळही येथेच उघडे पडते.

मालिक कोण, याचे उत्तर "अल्ला" असे श्रीबाबा देतात. वाटप कसाचे, किती प्रमाणात याचे उत्तर "जो जे वांछील" असे श्रीज्ञानेश्वर महाराज देतात. तुमची भूमिका या वाटपात कोणती, याचे उत्तर "फोडिल भांडार धन्याचा हा माल! मी तव हमाल, भारवाही" असे श्री तुकाराम महाराज देतात.

देवाची हमाली करताना संत सर्वांचा संतोष पाहातात. दाता, दानी एक ईश्वर, असे म्हणतात. ईश्वराचे हे भांडार सर्वांना खुले आहे असा अंतस्थाचा स्फोट करून, ते तुम्ही लुटा असा प्रेमळ आदेश ते देतात.

वहिवाटीचा हक्क मानवी कायद्याच्या शिक्कामोर्तबामुळे मालकीहक्क होऊन बसतो. हा संचय माझ्या मालकीचा अशी भाषा बोलण्यास तो शिकतो. पण संत मात्र "मी अनल हक्क नव्हे" असे सांगतात "मी यादे हक्क आहे" अशी नम्र भूमिका धारण करतात. मी स्वतः देव नव्हे, देवाचा बंदा नोकर आहे या भूमिकेने ते कर्मे करतात.

दान म्हणून मोठ्या उदारपणे आपण जे इतरांना देतो ते वस्तुतः आपल्या मालकीचे नसतेच. परमेश्वराने आपल्या पदरी घातलेले ते भाग्य असते. त्याचा खोटा मोठेपणा मिरवून स्वतःचे महत्त्व मात्र आपण वाढवित असतो.

# नित्य मी जिवंत जाणा हेचि सत्य, नित्य घ्या प्रचिती अनुभवे

–डॉ. कु. शुभांगी म. पितळे
पितळेवाडी, हनुमान रोड, विलेपार्ले ४०० ०५७

* सुमारे ६४ वर्षांपूर्वी श्री क्षेत्र शिरडी येथे साईमाऊलीने आपल्या नश्वर देहाचा त्याग केला; परंतु आज ही ती आपल्या भक्तांना ह्या ना त्या रूपात दर्शन देते, अनुभव देते. आपण मनापासून तळमळीने हाक मारली, की भक्ताचे गाऱ्हाणे दूर करण्यासाठी श्री साईमाऊली तातडीने धाव घेते. हा आपला सर्वांचा अनुभव आहे. असाच मला नुकताच आलेला रोमांचकारी अनुभव पुढे सांगत आहे. या अनुभवामुळे माझी साईबाबांविषयी असलेली श्रद्धा व निष्ठा आणखीनच वृद्धिंगत झाली.

माझी एक परमप्रिय मैत्रीण ह्या वर्षी वाणिज्य शाखेच्या प्रथम वर्षाच्या परीक्षेला बसली होती. दिनांक १५ मे रोजी मुंबई विश्वविद्यालयाने त्यांचा निकाल जाहिर केला. ह्या परीक्षेत तिला एका विषयात (गणित) अपेक्षेपेक्षा कमी मार्क्स मिळून ए. टी. के. टी. मिळाली. अर्थात् ही गोष्ट वाईट होती. आम्ही सर्वांनी तिला रिझल्टच वाईट आहे. ह्यावर विश्वविद्यालयाकडून चौकशी होईल म्हणून तू फेरतपासणीसाठी अर्ज दाखल कर, असे सांगितले.

त्यानंतर थोड्या दिवसांनी मी व ती साईंच्या देवळात जाऊन आशिर्वाद घेऊन युनिव्हर्सिटीत गेलो. तेथे फेरतपासणीसाठी थोड्याच दिवसांचा अवधी दिला असल्यामुळे विद्यार्थ्यांची एकच झुंबड उडाली होती. आमच्याकडील तिच्या कॉलेजने दिलेला व खुद्द युनिर्व्हसिटीचा फॉर्म यामध्ये फारच तफावत आढळली. तसेच प्रश्नपत्रिकेची खरी प्रत जोडा असेही सांगितले होते. आमच्याकडे ती नव्हती. मी शेजारच्या मुलाकडून प्रश्नपत्रिका घेऊन दुकानातून त्याची कॉपी आणण्यास गेले. ही जमवाजमव करेपर्यंत अर्ज स्विकारायची वेळ संपत आली. तिचा धीर खचत होता. मी मनातल्या मनात साईंचा धावा करत होते.

इतक्यात एक चमत्कार घडला. दारावरचा रखवालदार मुलांची गर्दी हटवत असता मी एका बाजूला उभी होते ती रांगेतील पहिल्या क्रमांकावर आले आणि आत शिरले. माझी मैत्रीण जी शेवटी ताटकळत उभी होती, तिच्याकडून खूण करून सर्व कागद मागून घेतले व पैसे भरले आणि विचारले "किती दिवसांनी कळेल?" त्याचवेळी एक अत्यंत मनोहर अशी श्रीसाईंची प्रतिमा असलेली अंगठी घातलेला हात मला दिसला व पावतीबरोबर उत्तर आले, "१५ दिवसांनी". जणू काही बाबाच मला सांगत होते. "श्रद्धा ठेव आणि सबुरीनं घे." अत्यानंदाने मी तिला सांगितले, अग आपले काम नक्की झालेच.

त्यानंतर थोड्या दिवसांनी खरोखरच पेपरात बातमी वाचली की अपरि-हार्य कारणामुळे बऱ्याचशा निकालात चुका आढळून आल्या आहेत. संबंधितांना नवीन सुधारीत गुणांची पत्रे येतील. तिच्याही घरी ती उत्तीर्ण झाल्याचे पत्र आले व घरावरचें एक नैराश्याचे सावट दूर झाले.

ही बातमी ऐकताच आनंदातिशयाने माझे मन मोहरून गेले. भक्तिभावाने साईमाऊलीच्या प्रतिमेला हात जोडताच शब्द आठवले —

घडो सतत सत्कृति मतीही दे जगत्पावना ।
समर्थ गुरु साईनाथ पुरवी मनोकामना ॥



# प्रभादेवीचा 'श्रीसिद्धीविनायक'

-श्री. गणपतराव सामंत एम. ए.
निवासी व्यवस्थापक – श्रीमहालक्ष्मी मंदिर
मुंबई – ४०० ०२६.

● सर्व देवांमध्ये गणपती अग्रेसर स्थान आहे. गणपती मंदिरे भारतात व इतर देशातही आढळतात. अशाच एका मुंबईतील प्रभादेवीच्या परिसरातील पुरातन व सुप्रसिद्ध "सिद्धिविनायका" बद्दल माहिती देण्याचा हा एक नम्र प्रयत्न. नवसास पावणाऱ्या अशा या मंदिराकडे मंगळवार, संकष्टी अंगारीका अशा दिवशी भाविकांच्या रांगा पाहून असे वाटते की खचितच हे जागृत देवस्थान आहे. आपल्या तेजाने, शक्तिने हे दैवत भाविकांस आपल्याकडे खेचत आहे. भाविकांच्या मनोकामना पूर्ण झाल्यामुळेच भाविक वारंवार खेचले जातात.

या सिद्धीविनायका विषयी जी माहिती उपलब्ध आहे ती अशी–

मुंबईमध्ये आज जिकडे–तिकडे इमारती दिसत आहेत. मोकळ्या जागा दिसल्या की त्याठिकाणी इमारती आल्याच. झाडे तोडून इमारती बांधणे हा एकच उद्योग मुंबईत चालू आहे. अशा परिस्थितीत आपण जर प्रभादेवी विभागात गेलो तर तेथे बरेच माड, जुनी बैठी घरे, थोड्या मोकळ्या जमिनी त्यावर भाजीपाला लावलेला असा निसर्ग अजून दिसतो व याच परिसरात सिद्धिविनायक मंदिर आहे. सुमारे शंभर वर्षामागे एका आग्री जातीच्या बाईने हे मंदिर बांधले. या बाईच्या घरातील भिंतीवर उजव्या सोंडेच्या गणपतीचे चित्र होते व या चित्रावरूनच ही सध्या असलेली गणपतीची मूर्ति तिने घडवून घेतली व प्रभादेवीला स्थापना केली. शास्त्रातील वर्णनाप्रमाणे मूर्तिची घडण आहे.

मूर्ति साधारण तीन फूटी व काळ्या पाषाणाची असावी. नंतर कालांतराने तिच्यावर शेंदूरी रंग चढवला असावा. सोंड उजवी, माथ्यावर मुकूट, चार हात, वरच्या दोन हातात अंकुश व कमळ, खालच्या उजव्या हातात माळ व डाव्या हातात मोदकवाटी, लहान उदर, गळ्यात सर्पाचे जानवे, बाजूना ऋद्धि–सिद्धी अशी साधारण घडण आहे.

श्री अक्कलकोट महाराजांचे शिष्य रामकृष्ण जांभेकर यांच्या आज्ञेवरून गणेशभक्ति परायण श्री. गोविंद चिंतामण फाटक यांनी प्रभादेवीस येऊन बरेच कष्ट घेऊन या सिद्धीविनायकाची देखभाल केली. परिसर सुधारला व मूळ पाषाणी मूर्ति रंगवून आकर्षक बनविली.

लक्ष्मण विठू पटेल यांनी हे देऊळ १९ नोव्हेंबर १८०१ रोजी बांधून पूर्ण केले.

वर लिहिल्याप्रमाणे ज्या आग्री बाईने ही मूर्ति बनवून घेतली ती माटुंग्यास रहात असावी. घरची परिस्थिती सधन होती पण तिला मूल नव्हते. म्हणून तिने मूल झाल्यावर गणपति मंदिर बांधू असा नवस केला होता. पण मूल होण्यापूर्वीच तिचा पति निधन पावला. अशा परिस्थितीत जरी मूल झाले नाही तरी तिने आपला नवस पूर्ण केला. निदान आपणास गणपती पावला नाही तरी इतरांस तो पावो या सदिच्छेने तिने गणपतिमंदिर बांधले. हाच सिद्धी-विनायक आज अनेकांना पावतो याची प्रचिती येते.

वरील माहिती काल्पनिक नसून ती "मुंबईतील देवालये" ले. रघुनाथजी व "श्रीगणेशकोष" या ग्रंथांच्या आधारे आहे.

या एकंदर माहितीवरून हा सिद्धीविनायक जवळ–जवळ पावणे दोनशे वर्षांचा असावा. मूर्ति हल्लीची असो, ऐतिहासिक असो व पौराणिक असो आपणास एक गोष्ट मान्य करावयास हवी की जसे–जसे भाविक आपल्या पूजेने, श्रद्धेने, पारायणांनी, शास्त्रोक्त यज्ञ व हवनांनी त्या मूर्तिची प्रतिष्ठापना करतात तसे–तसे मूर्तिमध्ये चैतन्य निर्माण होते. अग्निहोत्र, होम, हवनद्वारे मूर्तिला एक आगळे तेज येऊन जागृतावस्था निर्माण होते.

आपण गणेशचतुर्थीस असा अनुभव घेतो की श्रीची मूर्ति स्थापना होण्या-पूर्वी व झाल्यानंतर वेगळी भासते. मूर्तिची स्थापना झाली की त्यात नवचैतन्य आल्यासारखे वाटते. अर्थात् निरिश्वरवादी, अतिबुद्धिवंत अशा दांभिकांना पटणार नाही व कोणीहि पटवून देण्याचा प्रयत्न करू नये. कारण खरोखरच जागी गेलेल्यास उठविता येते पण झोपेचे ढोंग करणाऱ्यास उठवता येणार नाही. परिस्थितीचे चटके बसले, अपयश व दुःख पदरी पडले म्हणजेच हे ढोंगी जागे होतात.

या सिद्धीविनायकाने गेल्या पाच वर्षांत बरीच खळबळ अनुभवली आहे. राजकारणाची तर झळ लागलीच पण आपलेच हिंदू लांबच-लांब भाविकांच्या रांगा बघून उपहासात्मक टीका करू लागले. लिहू लागले, व अशा तऱ्हेने भाविकांच्या भावनांवर, श्रद्धेवर घाव घालू लागले. अशा दांभिकांना एकच विनंती करावीशी वाटते की त्यांचा सिद्धिविनायकावर विश्वास नसेल तर नका ठेऊ पण श्रद्धेवर घाव घालू नका. भाविकांची रांग लागते ती त्यांच्या इच्छे-नुसार कोणी सक्ती केल्यामुळे नव्हे. ते खर्च करतात आपल्या ऐपतीप्रमाणे. मग या दांभिकांना दुःख का ? सवंग कीर्तिच्या मागे लागणाऱ्या या दांभिकांना एकच इशारा की "श्री"चा कोप महाग पडेल. चुकीची दुरुस्ती करता येणार नाही. दुःखाचे डोंगर कोसळल्यावर देवाधर्मावरील श्रद्धा तारक ठरते. दररोज मंत्री बदलत असल्यामुळे वशिले अपुरे पडतात पण गणपती एकच असल्यामुळे ह्या वशिला सार्थ ठरतो. वेळीच सावधान.

कोणत्याही कार्यात अगोदर गणपतीची प्रार्थना करावी लागते. श्रीगणपती अथर्वशीर्ष एक जागृत व फलदायी स्तोत्र आहे. प्रत्येक महिन्याच्या शुद्ध-चतुर्थीस 'वरदायिनी' म्हणतात. यावेळी व्रत पालन केल्यास श्रींची प्राप्ति होते. कृष्ण चतुर्थीस 'संकष्टनाशिनी' म्हणतात व व्रत पालनाने संकटे नाश पावतात.

मंगळवार, संकष्टी, अंगारक योग, अंगारिका, मार्गशीर्ष-चैत्र-भाद्रपद उत्सव साजरे करून फलप्राप्ति होते. नेहमीचे व्यवहार सांभाळून जे झेपते तेच श्रद्धेने केल्यास यशप्राप्ति होते.

मंदिरातील वातावरण पवित्र असते. भाविकांच्या श्रद्धेमुळे व इतर शास्त्रोक्त विधीमुळे एक वेगळेच चैतन्य निर्माण झालेले असते. निर्गुण निराकार ईशतत्त्व सगुण साकारात आपल्या समोर असते व अशा भारावलेल्या पवित्र वातावरणात भाविकांच्या इडा-पीडा नष्ट व्हाव्यात यात काहीही नवल नाही

गणपतीने पार्वतीच्या पोटी मयूरेश्वर नांवाने अवतार घेऊन सर्व देवांची सिंधू राजाच्या बंदिवासातून सुटका केली. मयूरावर बसून कमलासुराचा वध केला व त्याचे तीन तुकडे तीन दिशांना गणपतीने फेकले मस्तकाचा भाग जेथे पडला तेच मोरगाव गणपतीचे तीर्थक्षेत्र.

भगवान विष्णूने मधुकैटभ नावाच्या दैत्याचा संहार करण्यासाठी गणपतीची आराधना करून सामर्थ्य मिळविले ते ठिकाण सिद्धटेक. येथे भक्तांचे मनोरथ सिद्धिस जातात

पाली या गावी कल्याणश्रेष्ठी व इंदुमति या वैश्य दांपत्यास गणपती-भक्तिमुळे बल्लाळनामक पुत्र झाला. 'भाद्रपद शुद्ध चतुर्थीला जे भक्त येथे येतील त्यांच्या मनःकामना मी पूर्ण करीन' असे आश्वासन भगवंताने बल्लाळला दिले तेच स्थान पाली–बल्लाळेश्वर.

गृत्सम ऋषींवर महड (मढ) येथे गजाननाने कृपा केली तेच श्री वरद-विनायक महड स्थान की ज्या ठिकाणी स्नान–दान करण्याने पुण्य मिळते.

कपील मुनींना इंद्राकडून मिळालेला 'चिंतामणि' गणदैत्याने हिसकावून घेतला. कपील मुनींनी गणपतीची आराधना केल्यावर, गणपतीने 'चिंतामणि' कपीलमुनींना मिळवून दिला, व तेव्हांपासून हा गणपति 'चिंतामणि' थेऊर येथे वास करुन आहे.

लेण्याद्रि नामक पर्वतावर गजाननाची पार्थिव मूर्ति करुन पार्वतीने गजानन हा पुत्र व्हावा म्हणून उग्र तपश्चर्या केली. तीच मूर्ति एका भाद्रपद शुद्ध चतुर्थीला सचेतन होऊन पार्वतीसमोर उभी राहिली व सिंधूदैत्याचा नाश केला. तोच गिरीजात्मक लेण्याद्रि.

विघ्नासुराचा पाडावकरुन त्याच्याच विनंती वरुन गजाननाने श्रीविघ्नेश्वर नाव धारण केले व तेथेच ओझर येथे देवांनी श्रीविघ्नेश्वराची स्थापना केली. याविघ्नेश्वराचे भजन–पूजन केल्यास विघ्नांचा नाश होतो.

रांजणगाव येथे त्रिपुरासुर दैत्याने त्रिभुवनाला हैराण केले. शंकराने गण-पतीची प्रार्थना केली व आद्य बीजमंत्र मिळविला व त्या बलावर शंकरान त्रिपुरासुर संहार केला. येथील मंगलमूर्ति नवसास पावते. तेथे तळघरात दहा सोंडांची व वीस हाताची मुख्य मूर्ति आहे. तिचे ध्यान मोठ्या संकटकाळी विशिष्ट कार्याविना करू नये अशी प्रथा आहे.

असे बरेच सिद्ध गणपती आहेत. वर काहींचा उल्लेख एवढ्यासाठीच की गणपती हा देवांचा देव आहे हे पटवून देण्यासाठी या मूर्ति पाषाणाच्या आहेत पण अनेक वर्षे भक्तांनी त्याठिकाणी आपली श्रद्धा ओतली आहे व ओतत आहेत. म्हणूनच या मंदिरात नवचैतन्य आहे. अशाच प्रकारे प्रभादेवीच्या सिद्धीविनायक आज मुंबईत भक्तांना दिलासा देत आहे – फलद्रूप होत आहे.

(पान ४१ वर पहा)

# विशेष पुण्याईचे फळ

—श्री. मधुसूदन वामन करंबेळकर
रघुनाथ निवास, चेंबूर गावठाण,
मुंबई नं. ४०० ०७१.

**यदा पुण्य विशेषेण लभते संगति सताम्**
**मद्भक्तांना सुशान्तानां तदा मद्विषया मतिः**

० प्रभू रामचंद्रांनी तारेला उपदेश करताना वरील श्लोक सांगितला आहे. अर्थ — पुढे जेव्हां काही सुकृत—पुण्य उदयास येऊन अत्यंत शांत आणि माझ्या भक्तीत रममाण होणारे अशा सत्पुरुषांची संगति लाभते तेव्हाच त्यांच्या मनात मज संबंधी प्रेम उत्पन्न होते. एकनाथी भागवतातसुद्धा वरील अर्थाचा श्लोक आलेला आहे.

**'कोटी जन्मांची पुण्य संपत्ती । जरी गांठी असेल आरती । तै जोडे माझ्या संतांची संगती । सत्संगे भक्ति उल्हासे ।।**

श्रीसमर्थ साईभक्त शिरोमणि श्री. म्हाळसापति भगत यांची पुण्याई किती जबर असेल याची कल्पना वरील श्लोकाधारे करता येईल. श्रीरामचंद्रांकरिता श्री लक्ष्मणाने बारा वर्षे उपवास, निद्रात्याग व ब्रम्हचर्य व्रत पाळले त्यामुळे अजिंक्य योद्धा इंद्रजित मरण पावून रामायण निर्माण होण्यास सहाय्य झाले. त्याचप्रमाणे श्री म्हाळसापती मुळेच श्री साईच्या देहाचे रक्षण होऊन 'श्रीसाई-रामायण' निर्माण झाले ही हकीगत श्री साईभक्तांना माहित आहेच म्हणून फिरून लिहित नाहीं. श्रीसाईंचा नित्य सहवास, श्रीसाईनाम मुखात, श्रीसाईंची सेवा, व श्री साई अमृत वचने नित्य कानावर पडणे हा योग साध्यासुध्या पुण्याईने होणारा नाहीं. श्रीबाबा आपणहून त्यांचेकडे आले त्यांना संत शोधण्या-करिता वणवण करावी लागली नाहीं. श्रीबाबांच्या कृपेने ते संसारात विरक्तीने राहिले. आज आपण श्री बाबा किंवा श्री म्हाळसापति यांना सदेह पाहू शकत नाहीं. परंतु ह्या दोघांचेही सहवासात रहाणारे व ज्यांचे नाव श्री बाबांनीच ठेवले आहे. असे 'श्री मार्तंड भगत' (श्री. म्हाळसापतिंचा सुपुत्र) शिर्डीत आहेत. शंभरीच्या घरात गेलेले श्री. मार्तंड आजोबा श्रीबाबांच्या आठवणी, श्रीबाबांचे

उर्दू मंत्र असखलीत त्यांचे म्हणण्याचे घाटणीप्रमाणे म्हणून दाखवितात. श्री बाबांची त्यांचे हातून फार सेवा झालेली आहे.

लेखक, कवीसंमेलन ९ करिता मी व माझे स्नेही श्री. मोघे शिर्डीला गेलो होतो त्यावेळी आम्ही श्रीमार्तंड महाराज यांची मुद्दाम गाठ घेतली होती. त्यांचे बरोबर बोलताना, त्यांच्या आठवणी ऐकताना फार आनंद वाटला. वडीलांप्रमाणेच त्यांचेही पाठी फार प्रचंड पुण्याई उभी आहे अशी माझी पूर्ण श्रद्धा आहे. बोलता बोलता श्री मार्तंड देव म्हणाले 'श्रीबाबांनी मला जे काही दिले आहे. किंवा त्यांचे सेवेने जे मला मिळाले आहे, किंवा ज्यामुळे नित्य आनंद वाटेल, सुखप्राप्ती होईल ते मी त्यांचेच कृपेने तुम्हालाही देत आहे. मात्र नित्य लक्षात ठेवा, असे म्हणून एका कानात 'साईबाबा व दुसऱ्या कानात 'साईराम' असे दोन शब्द त्यांनी मला सांगितले. यावरून नामावर असणारी ज्वलंत श्रद्धा कळून येते. श्रीबाबांना खेचून आणण्याचे सामर्थ्य ह्या नाम मंत्रात आहे. नाम जे करील ते देव, प्रत्यक्ष जवळ असूनही करू शकणार नाही. राम नामाने श्री मारुतीराय समुद्र सहज ओलांडून गेले परंतु श्रीरामाना मात्र सेतू वरून जावे लागले. साईबाबा, साईराम ह्या नामात किती प्रचंड ताकद आहे याबद्दल घडलेली सत्य हकीगत सांगतो.

श्री कृष्णा जयराम भट हे हनुमान लेन 'विलेपार्ले पूर्व' येथे रहात होते. त्यांचा जन्म सन १९०३ साली झाला व सन १९७० साली त्यांना देवाज्ञा झाली. श्री. साईकृपेने त्यांची आर्थिक परिस्थिती उत्तम होती. ते किवि. बूट पॉलिशचे हिंदुस्थानात एजंट होते. श्री साईबाबांवर त्यांची अत्यंत पूर्ण श्रद्धा होती. दरवर्षी ते शिर्डीला उत्सवासाठी जात असत व त्यामध्ये ते जातीनें भाग घेत असत. त्यांचा उत्साह पाहून साईभक्तांनी त्यांना साई मठाच्या व्यवस्थापक कमिटीमध्ये मेंबर करून घेतले होते.

सन १९५३ सालची गोष्ट. ते टॉयफाईडच्या तापाने खूप आजारी झाले होते. १०–१२ दिवस झाले तरी ताप उतरेना. ताप वाढतच होता. औषधाचा कांहीही उपयोग होईना. सर्वांना काळजीच वाटत होती. त्यांनाही श्वास सोसवेना. तेव्हां त्यांनी 'साईबाबा, साईराम' हा जप सुरू केला. डोळ्यात अश्रू आले व मन साईचरणी तल्लीन झाले. ह्या स्थितीत त्यांना झोप लागली. थोड्याच वेळात 'श्रीसाईनाथ' त्यांचे स्वप्नात आले. त्यांच्या अंगावरून हात फिरविला व त्यांचे पोट चिरून आतली आतडी बाहेर काढून पाण्याने धुवून साफ करून

श्रीरामाची प्रार्थना करून पुन: योग्य जागी ठेवली. जेव्हां श्री. कृष्णराव स्वप्नातून जागे झाले तेव्हां त्यांना घाम येऊन ताप पूर्ण उतरला होता आणि १५ दिवसांनी ते पूर्ण बरे झाले. पुढे श्री साईबाबांच्या कृपेबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी श्री बाबांच्या उत्सवाच्या वेळी त्यांनी एक अब्दागिरी तयार करून साई संस्थानाला अर्पण केली. दांडा (छत्रीचा) चांदीचा होता. शेवटपर्यंत ते साईबाबांचे थोर भक्त म्हणून राहिले.

शिर्डीला ज्या एका मद्रासी हॉटेलमध्ये ते नेहमी उतरत ते हॉटेलवाले अजुनही त्यांच्याबद्दल आठवणी सांगत असतात.

चेंबूरला स्टेशनजवळ 'आशाकुंज' म्हणून बिल्डिंग आहे. तेथे त्यांचे मामा श्री. धोंडो शेषगिरी बापट रहातात. त्यांनी ही हकीगत मला सांगितली. असो.

काही तरी पुण्यगाठी असेल तरच त्याला शिर्डीचे दर्शन व मुखी नाम राहू शकेल. नामामध्ये असणारे सामर्थ्य लक्षात ठेऊन आपणही बोलू या 'जय साईबाबा जय साईराम.'

# जया मनी जैसा भाव । तया तैसा अनुभव

–ॲड. श्री. कृष्णराव काशिनाथ थिटे
बी. एस्सी., बी. एड्., एल्. एल्. एम्.
२५८ कसबा पेठ, पुणे – ११.

० श्री सद्गुरु साईबाबांविषयीच्या लेख, कविता मी श्रीसाईलीला मासिकातून वाचत आहे. श्री बाबा खूपच लोकांना स्थलकालाचा कोणताही आडपडदा न ठेवता, स्वप्नांत, दृष्टांतात अथवा प्रत्यक्ष दर्शन देतात याविषयी मी खूपच साईमहती वाचली होती परंतु भगवान श्रीकृष्णांनी भगवद्गीतेत सांगितल्याप्रमाणे मी कोणत्याही फळाची आशा न धरता शिवाजीनगर, पुणे येथील रासने चाळीतील साईमंदिरात नित्य नियमाने साईदर्शन व पूजाविधि करत होतो व आहे. श्रीसाईबाबांची माझी भक्ति दिवसेंदिवस वाढतच आहे. व त्यानुसार साईभक्तांच्या नवीन ओळखी झाल्या व श्रीसाईनाम गुणसंकीर्तन वगैरेत मी

रममाण झालो आहे व मिथ्या भवसागराची आसक्ति दिवसेंदिवस कमी कमी होत चालली आहे.

मी गुरुवारी नित्यनियमाने साईमंदिरात जात होतो व साई मंदिराजवळ अतिशय गर्दी असल्याने मी माझी मोटरसायकल मंदिरापासून सुमारे १२५ फूटावर उभी केली व श्रीबाबांच्या दर्शनासाठी मंदिराकडे निघालो. मी गाडी उभी केल्याबरोबरच एका भिक्षुकाच्या रूपात एक व्यक्ति माझ्या पुढे उभी राहिली व काहीही न बोलता माझ्यापुढे फक्त हात पुढे केला मी भिकारी समजून पँटच्या खिशातून १० पैशाचे नाणे काढून त्या भिकाऱ्याच्या हातावर ठेवले. त्या निर्विकार चेहऱ्याच्या व्यक्तिने ते १० पैशाचे नाणे घेतले व काहीही न बोलता पुढे ती व्यक्ति पुढे जाऊ लागली व माझे तोंड फिरविले परंतु माझ्या खिशातून एक रुपया देण्याची माझी इच्छा झाली व क्षणाचाही विलंब न लावता मी गर्रकन् मागे वळलो व भिकाऱ्याला पाहू लागलो तो मुख्य रस्ता खूपच लांब असूनही तो भिकारी अचानक अदृश्य झाला होता. अशा रितीने श्रीसाईबाबांनी माझ्या मनात असलेली श्री साई दर्शनाची सुप्त इच्छा भिकाऱ्याच्या रूपात मला दर्शन देऊन पूर्ण केली. कारण श्रीसाईबाबांची लीला अगाध आहे. मला प्रत्यक्ष दर्शन दिलेला भिकारी मी सदरच्या घटनेनंतर बऱ्याच वेळा शोधूनही सापडला नाहीं. श्रीसाईकृपा फळास आल्याशिवाय प्राणिमात्र किंवा तत्समांचा उद्धार होत नाहीं हे यावरून सिद्ध होते. वरील घटनमुळ माझी श्रीसाईबाबांवरील श्रद्धा जास्तच दृढ झाली. श्रीसाईबाबांची श्रद्धापूर्वक व अन्ययभावाने सेवा किंवा भक्ति केल्यास श्रीसाई भक्तांवर–सेवकांवर निश्चितच कृपाछत्र ठेवतात याचा प्रत्यय आला माझ्याप्रमाणे अन्य साईभक्तांवर साई महाराज कृपादृष्टी ठेवोत हीच श्रीसाईचरणी प्रार्थना.

# दत्तावतार साईबाबा

–श्री. दिगंबर शंकर गंधे
११२८ सदाशिव पेठ, पुणे ३०.

० पोलिसखात्यातील नोकरी सोडल्यावर श्री दासगणू दोन वर्षे तरी शिर्डीतच राहिले होते. तेव्हा त्यांना साईबाबांचे जीवन समक्ष पहावयास मिळाले. साईबाबा नुसतेच चमत्कार करणारापैकी नसून त्यामागचा त्यांचा पारमार्थिक अधिकार फारच थोर असल्याचे त्यांच्या विलक्षण बुद्धिस अनुभवास आले. त्यांच्या सहवासाचा परिणाम व प्रभाव दासगणूंच्यावर फारच झाल्यामुळे ते बाबांचे कनिष्ठ भक्त बनले. कीर्तनारंभीच्या एका पदात त्यांनी बाबांना उद्देशून "अपने मशिदका झाडू गणू" असे मोठ्या अभिमानाने म्हटले आहे.

दासगणूंनी साईबाबांच्या अनुज्ञेप्रमाणे पुष्कळ संतचरित्रे स्वतंत्र तऱ्हेने लिहिली आहेत. सुमारे पन्नास वर्षापूर्वी शिरोळ येथील भाविक मामलेदार बाबासाहेब पाटील यांच्या आग्रहावरून त्यांनी सरस्वती गंगाधर विरचित "श्रीगुरुचरित्र" ग्रंथाचे सार काढून ते "श्रीगुरुचरित्र सारामृत" या नावाने प्रसिद्धही केले. मूळ चरित्र बावन अध्यायांचे असून त्या कथानकाला कोणताही बाध न आणता हे सुटसुटीत सार त्यांनी सोळा अध्यायात बसविले आहे. त्याची ओवी संख्या अवघी २७२४ असून रोज तास दीड तासाचा वेळ दिल्यास त्याचे तीन दिवसात पारायण आरामशीर होते त्याच्या वाचनाला सोवळ्या ओवळ्याचे कडक बंधन तर नाहीच परंतु ते स्त्रियांना वाचण्याची मोकळीक आहे.

महत्वाची गोष्ट म्हणजे सोळाव्या अध्यायात दत्तक्षेत्राची व त्याच्या अवतारांची माहिती दिली आहे. त्यात शिर्डी हे दत्तक्षेत्र व साईबाबा हे दत्तावतार होते असा उल्लेख आहे. लेखक हा साईभक्त व दत्तात्रयांनी अनेक वेळा यावनी रूप धरले म्हणून साईबाबांना त्यांनी दत्तावतार ठरविले असे लोक म्हणतील त्यावर दासगणूंनी केलेले समर्थन लक्षणीय आहे. बिदरच्या बादशहाने गाणगापुरास येऊन स्वामींच्या पायावर लोळण घेतली व त्याने स्वामींना आपल्य सिंहासनावर बसविले. परंतु स्वामींनी त्यावर "आम्हां फकिराना सिंहासनाचे काय महत्त्व" असे बोलून नाराजी व्यक्त केली, आणि हे आपले म्हणणे खरे

करण्याकरिता दत्तानींच साईबाबांचा वेष घेतला. ही गोष्ट स्वत: साईबाबांनी दासगणूंना पुष्कळवेळा सांगितली होती. त्या अर्थाच्या ओव्या पुढील प्रमाणे आहेत:

फकीर शब्द करण्या खरे । दत्त झाले साई साजिरे ।
दत्तापरी वैराग्य पुरे । होते अंगी पाहिले म्या ।।
श्रोते शिर्डीत कित्येकवेळा । साईबाबा बोलले मला ।
की मी गेलो होतो बेदराला । संन्याश्याच्या वेषाने ।।

यामुळे ते दुराग्रहाने त बाबांना दत्तावतार मानीत नव्हते नाहीतरी साई-बाबांच्या स्तुतिपर पद्यात त्यांनी बाबांना "कमलोद्भव, कमलाकर, शिवहर त्रिगुणात्मक मूर्ती" असे म्हटले आहेच.

# श्रीसाई कृपेने लग्न पार पडले

–सौ. सुनंदा यशवंत वेढीकर
मु. पो. दहिसर, तर्फे मनोर,
ता. पालघर, जि. ठाणे,
पीनकोड – ४०१४०४

० साईबाबांवर माझी नितांत श्रद्धा आहे. अनेकवेळा बाबांनी आमचे संकट निवारण केले आहे. बाबा आपल्या भक्तांचे संकट निवारण करण्याकरिता सत्वर धावत येतात. आणि एकदा अशाच एका संकटाबद्धल मी घाबरले होते. मी बाबांना हात जोडून म्हणाले होते की, जर माझ्याकडील लग्नकार्य व्यवस्थित पार पडले तर, मी "साईलीला" मासिकामध्ये लेख देईन करिता खालील लेख मी माझ्या परीने जेवढा साध्य झाला तेवढा देत आहे.

आमच्याकडे १९७३ साली माझ्या मोठ्या मुलीचे लग्न होते. आम्ही उभयता आमंत्रणाकरिता बाहेर गावी गेलो होतो, आणि येथे घरी, चांगल्या

प्रकारे लग्नाचे कामकाज करणाऱ्या सासुबाई आजारी झाल्या, आणि लग्नाला चार दिवस बाकी असतानाच त्या आम्हाला सोडून परलोकी निघून गेल्या. आम्हांवर संकट कोसळले.

नंतर आमच्या पुतणीचे लग्न १९८० साली ठरले त्यावेळीसुद्धा तिचे आई-वडिल आमंत्रणास बाहेर गावी गेले असता, तिथेच वडिलांच्या पोटात दुखून आले, व एकदम सिरियस झाले. त्यांना त्वरित हॉस्पीटलमध्ये नेण्यात आले. तेथे त्यांना अल्सर आहे म्हणून सांगण्यात आले व ऑपरेशन करण्यात आले. तर येथे त्यांच्या गैरहजेरीत पुतणीचे लग्न पार पडले. म्हणजेच काळ आला होता परंतु वेळ आली नव्हती एवढेतरी चांगले झाले परंतु लग्नामध्ये आळा हा आलाच, असो.

आता ह्या वर्षी माझ्या दोन नंबर मुलीचे लग्न ठरले त्या दिवसापासून आम्हांला खूप भिती वाटत होती परंतु मी श्री साईबाबांना सांगितले की, बाबा हे लग्न विना काही विघ्नाने पार पाडा, आणि मी संपूर्ण साईबाबांवर विसंबून राहिले आणि खरोखरच कोणत्याही प्रकारचे संकट येऊ न देता श्री बाबांनी लग्नकार्य व्यवस्थितपणे पार पाडले. अशा ह्या साईचरणी माझे शतशः प्रणाम. म्हटलेच आहे, साई तारी त्याला कोण मारी.

*ooooooo*

# भाव भक्तीची शिरापुरी । कितीही खा सदा अपुरी ॥

—श्री. चंद्रकांत श्रीराम गरगटे
३९९ गुरुवार पेठ, सातारा ४१५ ००२.

० भक्ती म्हणजे परमात्म्याच्या ठिकाणी नितांत प्रेम असणं हे होय. भक्तीमध्ये प्रेम महत्वाचं आहे. आपण जितकं आपल्यावर प्रेम करतो त्यापेक्षा अमर्याद प्रेम परमेश्वरावर केले पाहिजे. कारण भक्तीचा प्रेम हा गाभा आहे.

भक्ती म्हणजे ईश्वरावरील परम प्रेम होय. ईश्वर लाभ हेच मानवाचे सर्वोच्च ध्येय होय.

ईश्वर निर्गुण आणि निराकार आहे पण जेव्हा जरूर पडते तेव्हा तो आत्ममायेच्या योगाने शरीर धारण करून अवतार घेतो. मानवात तो मानवा-प्रमाणे वावरतो परंतु काहीं वेळा आपले अवतारित्व निदर्शनास आणण्याकरिता तो चमत्कार आणि अलौकिक कृत्ये करून लोकांचे मन आपल्याकडे वेधून घेतो.

त्याचप्रमाणे भारत देशामध्ये समता, एकता आणि शांतता नांदावी म्हणून शिरडी नामक ग्रामी श्री साईबाबा हे बालवयामध्ये निंबतरूखाली प्रकट झाले. त्यावेळी त्यांचे कोवळे, गोंडस रूप पाहून आणि एवढ्या लहानशा वयामध्ये एवढी घोर तपश्चर्या पाहून नगरीतील सर्व लोक आश्चर्य करू लागले. या कली-युगामध्ये श्री बाबांचा अवतार म्हणजे या जगास मिळालेले वरदानच आहे.

त्यानंतर ते लहान बालक कुठे दिसेनासे झाले. चांद पाटलाच्या पत्नीच्या भाच्याच्या लग्नाच्या निमित्ताने पुन्हा ते बालक वयाच्या सोळाव्या वर्षी शिरडी नगरामध्ये प्रकट झाले. श्री साईबाबांच्या पवित्र पदस्पर्शाने शिरडीची भूमी पावन झाली.

हळू हळू श्री साईबाबांची किर्ती सुगंधीत वायू लहरीप्रमाणे पसरू लागली. आजदेखील अनेक भक्तजनांना याची प्रचिती येते की, कोणास बाबा दृष्टांत रूपाने भेटले, तर कोणास व्यक्तिच्या स्वरूपात भेटले. प्रत्येकास त्याच्या त्याच्या भक्तीप्रमाणे बाबांनी भक्तास भेट देऊन त्याचे दुःख नाहीसे करून त्याला सुख-समृद्धीचा मार्ग दाखवून दिला.

ही सृष्टी म्हणजे परमेश्वराने लिहिलेले महाकाव्य आहे. प्रत्येक प्राणी आणि त्याचे जीवन हे त्या महाकाव्याचे मधुर कडवे आहे.

श्री साईबाबांची मुख्य शिकवण म्हणजे श्रद्धा आणि सबुरी. श्रद्धा म्हणजे भक्ती आणि सबुरी म्हणजे धीर, शांती. श्री साईबाबांचा हाच गुरुमंत्र आहे.

श्रद्धा म्हणजे अढळ विश्वास होय. श्रद्धा हा मानवी जीवनाचा पाया आहे. ज्याप्रमाणे ज्याची श्रद्धा असेल त्याप्रमाणे त्याचे व्यक्तिमत्व घडत असते. मनुष्य हा स्वभावतःच श्रद्धावान असतो. ज्याप्रमाणे सूर्याशिवाय दिवस होत नाही. त्याप्रमाणे श्रद्धेशिवाय जीवनाला गती येत नाहीं.

मासा अहोरात्र पाण्यामध्ये असतो तेव्हा तो झोप कसा घेतो याचे उत्तर तोंडाने सांगता येण्यासारखे नाही. त्यासाठी स्वतः मासाच झाले पाहिजे त्याच-प्रमाणे जो त्या स्थितीला पोचला असेल त्यालाच तसे राहणे जमते. जेथे वाणीच खुंटते तेथे प्रश्नाचे उत्तर कोण देणार?

भक्ती करण्यासाठी गुरु आणि शिष्याची आवश्यकता आहे. गुरुच्या अंगी आवश्यक असणारे गुण खालीलप्रमाणे आहेत –

–निष्कलंक, निष्पाप, हृदयाची शुद्धता, चारित्र्य व निष्कपट.

–शिष्याच्या अंगी आवश्यक असणारे गुण खालीलप्रमाणे आहेत !

–पावित्र्य, खरी ज्ञानपिपासा, निष्ठा व चिकाटी.

आज या कलीयुगात सध्या देखिल काही गुरु भेटतात. परंतु हे गुरु कोणत्या तरी एखाद्या देवाचा आधार घेऊन स्वतःचा स्वार्थ, मोठेपणा आणि जनामध्ये स्वतःची प्रतिष्ठा वाढविण्याचा प्रयत्न करतात. जे अंतःकरणापासून शुद्ध, पवित्र भक्त असतात ते आपण करीत असलेल्या भक्तीमध्ये काहीं त्रुटी राहूनये म्हणून गुरु या दृष्टीकोनातून त्यांच्याकडे जात असतात. परंतु हे गुरु स्वतःचीच सेवा करून घेण्यासाठी आणि स्वतःच्या वैयक्तिक व घरगुती स्वरू-पाच्या कामासाठी या भाव–भोळ्या शिष्यांचा उपयोग करून घेतात. बिचारे शिष्य (भक्त) हे मनामध्ये परमेश्वराची सेवा करून परमेश्वराच्या चरणापर्यंत भिडण्याचा प्रयत्न भक्तीच्या आधारे करीत असतात.

शिष्याची निस्सीम भक्ती, पवित्रता, आचरण, चिकाटी पाहिल्यानतर तो शिष्य आपल्यापेक्षा श्रेष्ठ ठरेल या भितीने, हे आधुनिक गुरु स्वतःच्या आसनास धक्का लागू नये, स्वतःचे आसन डळमळीत होऊ नये म्हणून त्या शिष्यावर भक्तावर काहीतरी आरोप लावून त्याचा ते अव्हेर करतात

हे आधुनिक गुरु त्या शिष्याची सत्वपरिक्षा पहात नाहीत तर त्याच्या निस्सीम भक्तीशी उध्वस्त स्वरूपाची परीक्षा घेतात. आधुनिक गुरु हे अंगाला चुना फासणाऱ्या कावळ्यासारखे असतात.

कावळा जर अंगाला चुना फासून मी राजहंस झालो आहे असे मानू लागला तर पाऊस आला की, चुना धुवून जाणार आणि शेवटी कावळा तो कावळाच राहणार.

याचा अर्थ असा नव्हे की, जीवनामध्ये गुरु नसावा. गुरू असावा पण तो निष्कलंक, निष्पाप, हृदयाची शुद्धता, चारित्र्य आणि निष्कपट इत्यादी पाच गुण अंगी असलेला असावा.

श्रीकृष्ण गीतेत सांगतात की, परमेश्वराचे चिंतन करणाऱ्या हजारो लोकांपैकी एखादाच ममुक्षु असतो. हजारो मुमुक्षुंपैकी एखाद्यालाच परमेश्वराचे यथार्थ ज्ञान होते. त्याप्रमाणे भूतलावर पूर्ण पुरुष क्वचितच आढळतात.

खरा गुरु हा ब्रम्हनिष्ठ, दयेचा सागर, केवळ लोकांच्या कल्याणासाठीच झटणारा, पैशासाठी, किर्तीसाठी अगर कोणत्याही हेतूसाठी ज्ञानाचा विक्रय न करणारा असाच असतो.

गुरु म्हणजे आपले सर्वस्व. गुरुवाचून अन्य दैवत नाही. असे जेव्हा शिष्याचे ठाम मत होते. तेव्हांच गुरु आपल्या शिष्यावर गुरुकृपा करतात.

कंदिलात तेल व वात आहे पण काडी पेटवून लावल्याशिवाय कंदील जसा प्रकाशमान होऊ शकत नाहीत तद्वत मनुष्याजवळ सुख आहे व ते भोगण्याची इच्छा पण आहे. परंतु सद्गुरुंच्या मार्गदर्शनाशिवाय त्याला सुखरूप होता येत नाहीं.

या तत्वाप्रमाणे गुरु हा जीवनाचा महत्त्वपूर्ण असा भाग आहे.

वातीने तेलाचे सहाय्य घेतल्यावरच तिला जसा दिवा होण्याचा अधिकार प्राप्त होतो, त्याप्रमाणे देवाचे सहाय्य घेतल्यानंतरच मनुष्य गुरुकृपेला पात्र होतो.

कारंजातील तुषाराप्रमाणे हे आधुनिक गुरु निस्सीम भक्ती करणाऱ्या भक्तांकडे पाहून, त्याचा आपण अव्हेर केल्यानंतर तो निराधार झाल्यानंतर त्याच्याकडे पाहून हसत असतात. ज्याप्रमाणे कारंजातील तुषार खालच्या पाण्याकडे पाहून हसतात पण आपला देखील शेवट तेथेच होणार आहे हे ते पूर्णपणे विसरून गेलेले असतात.

याकरता जगातील कोणत्याही गोष्टीच्या कळसाकडे पाहू नका तर आधी पायाकडे पहा. कळसाकडे पाहून फार तर तुम्हांला आश्चर्याचा धक्का बसेल पण पायाकडे पाहून स्फूर्तीचा साक्षात्कार होईल.

मूळाला भाव घालून शेंड्याला पाणी घालत राहिले असता झाड जसे जगू शकत नाहीं. तद्वत लोकांच्या स्तुतीला भाळून जाऊन आपला मार्गदर्शक जो परमेश्वर याचे विस्मरण झाले की, साधक सहजच प्रगती-पथावरून घसरतो.

परमेश्वर हा कार्याच्या पाठीमागे असतो, मात्र ते कार्य आपण जिद्दीने व चिकाटीने केले पाहिजे.

"भगवान के घर देर है, अंधेर नहीं" ही श्रद्धा बळकट असली पाहिजे. त्यासाठी चिकाटी पाहिजे. चांगल्या फळाची झाडे उशीरा फळे देतात.

ईश्वर निराकारी विशाल वृक्षाचा धर्म हा पाया आहे. भक्तीच्या पाण्यावर तो पोसला जातो त्याग व अन्य गुण ही त्याची पाने-फुले आहेत व ज्ञान हे याचे फळ आहे.

झाड टवटवीत राहण्यासाठी जसे मुळाला पाणी घालणे जरूर आहे; त्या-प्रमाणे आपला संसार सुखमय होण्यासाठी आत्मचिंतन हे मुख्य आहे. हे जेंव्हा मनुष्याला कळून येते तेंव्हां मनुष्याला एक क्षण म्हणजे बहुमोलाचा वाटतो. कितीही व्यापात असला तरी त्यातल्या त्यात वेळ काढून तो आपले कार्य साधू शकतो.

जो आनंदाचा सागर, सुखाचे निधान, अणूपासून ब्रम्हांडापर्यंत सर्वांचा सांभाळ करणारा आणि सौख्याचे केवळ माहेर घर असा हा साई होय; आणि हेच याचे अखिल लोकास विश्राम देणारे असे नाम आहे.

जर सुख प्राप्तीची आपणास इच्छा असेल तर श्री साईबाबांची वचने ऐकून व त्यांचे मनन करून ती हृदयापाशी बाळगा. त्याकरिता श्री साईबाबांची मनोभावे, निस्सीम भक्ती करणे हाच सरळ आणि सुखाचा मार्ग आहे.

भाव भक्तीची शिरापुरी । कितीही खा सदा अपुरी ।
जरी आकंठ सेविली तरी । तृप्ती न परिपूर्ण कधीही ॥

+++

# साई तुझे नाम स्मरतो

—श्री. दत्ताराम पुंजाजी घुगे
विशेष कार्यकारी दंडाधिकारी,
३/२७ रमेशचंद्र चिमणलाल चाळ,
ताडदेव, मुंबई ४०० ०३४

जगात परमेश्वर आहे का? जेव्हां हा प्रश्न माझ्या नजरेसमोर उभा राहतो तेव्हा सद्गुरु साईनाथांच्या तसबिरीकडे पाहून त्यांची अकरा वचने मनात आठविल्याने प्रश्नाचे उत्तर नकळत गवसते की ईश्वर जगामध्ये कणाकणात आहे. भक्त प्रल्हादाची भक्ती पाहून साक्षात् नरसिंह हा विष्णूदेवाचा अवतार खांबातून प्रगट झाला. आपल्या बाल भक्तीवर ,त्यांच्या वडिलांकडून होणारे अन्याय पाहून क्रूर वडीलांना त्याने धडा शिकविला. त्याप्रमाणेच रामायण, महाभारत आदी धार्मिक ग्रंथाचे वाचन केल्यानंतर जगात देव आहे ही खात्री नम्रपणे पटते.

गुरुब्रह्मा ...गुरुविष्णू ...गुरुदेवो महेश्वरा हे नामस्मरण करीत असताना दत्तदिगंबराचे अवतार नजरेसमोर आपलेच पालनकर्ते दिसू लागतात. आमच्या ताडदेव विभागात माझ्या घराजवळ श्री दत्ताचे मंदीर असल्यामळे मी बालपणा पासून दत्तदिगंबराच्या भक्तीकडे आकर्षिला गेलो. दर गुरुवार हा आरतीचा वार कधीही मी चुकवत नसे. घरची मंडळी माझ्या या वेडया भक्तीकडे पाहून म्हणत असे "कसलं याला खूळ लागलं?" एके रात्री मला गाढ झोप लागली. त्या रात्रीच्या स्वप्नात हिरवेगार झाडाझुडूपांचे जंगल वाघ, सिंह, हत्ती या सारखे प्राणी त्या जंगलातून हिंडत होते. त्या वाघाच्या डरकाळ्या या भयानक स्वप्नाने घाबरूनच घामाने ओलचिंब झालो. त्या रात्री झोप काही येईना. नंतर पहाटे नंतर झोप लागली. झोपेत ते जंगलाचे दृश्य दिसले. धुरकट जंगलातून पांढऱ्या शुभ्र वस्त्रात तेजस्वी अवलीया. डोक्याला कफनी बांधलेला हातात भिक्षेचा कटोरा घेऊन दुसऱ्या हाताने आशिर्वाद देत म्हणाला, "जिंदगीमें कभी डरना नहीं यह अल्लामालिक तुम्हारे लिये बंदा है! एक बार शिर्डी चले आओ।" असा उपदेश तो अवलीया फकीर, साक्षात सद्गुरु साईनाथ करीत होते. खांद्यावरल्या पोपटाशी बोलत क्षितीजापार धुक्यात ते अदृश्य झाले. दुसऱ्या दिवशी झोपेतून उठल्यावर या स्वप्नाबद्दल घरच्या मंडळीना सांगितले

त्यांची खात्री काही पटेना. मला लहानपणापासून शिर्डीला जायची ओढ लागली. घरच्या आर्थिक अडचणीमुळे शिर्डीला जाता आले नाहीं. शाळेत माध्यमिक परिक्षेला बसून शाळेबाहेर नोकरी शोधार्थ पडलो. जवळ जवळ तीन चार वर्षे उलटली. त्या बेकारीमध्ये कविता लिहिणे, वृत्तपत्रीय लिखाण केवळ छंद म्हणून करीत असे. सद्‌गुरुंच्या कृपेमळे मुंबई आकाशवाणी केंद्रावर युववाणीत काव्य वाचनाचा कार्यक्रम मिळत असे. कुठे वर्तमानपत्रात लेख कथा किंवा कविता प्रसिद्ध झाली की थोडफारस मानधन मिळायच. सकाळीच पहाटे वर्तमान पत्राची लाईन टाकून हातात महिन्याला वीस-तीस रुपये मिळायचे. खर्चाच्या मानाने ते कुठे जायचे ते सुद्धा कळायचे नाहीं. तरीही गिरगावच्या साईधाम किंवा फॉर्जेट हिल साईबाबांच्या मंदिरात माझा गुरुवार चुकत नसे. या भावभक्ती मार्गाप्रमाणेच समाजसेवेची आवड फार होती. काखोटीला शबनम झोळी घेऊन जनहिताच्या समस्या सोडविण्यासाठी चौफेर वणवण मी भटकत असे. साई समर्थां-मुळे मला प्रसिद्धि मिळू लागली. स्थानिक आमदारांमुळे घरच्या लोकात जाऊन काम करायला संधी मिळू लागली. घरची शुभकार्ये थाटात उरकली. परंतु नोकरी नसल्यामुळे मन निराशजनक होते. ती मिळविण्यासाठी साईबाबांकडे मनोभावे विनंती करू लागलो. माझ्या आमदार मित्रांकडून मला दोनशे रुपयांचे आर्थिक सहाय्य बक्षिस म्हणून मिळाले माझा आनंद गगनात मावेनासा झाला. माझ्या जवळच्या मित्रावरोवर शिर्डीला जाण्याचे भाग्य लाभले. डोळे भरून मनसोक्त साईनाथांच्या मनमोहक मूर्तीकडे पाहत माझे बालपणातले स्वप्न साकार झाले. त्यांच्या अमर समाधीवर पुष्प सुमने वाहिली आणि मुंबईला परत आलो तर घरी आयुर्विमा महामंडळाच्या कंपनीत फक्त ८५ दिवस नोकरीचा कॉल एम्प्लॉयमेंट एक्स्चेंज कडून पोष्टाने आला होता. त्या नोकरीच्या मुलाख-तीला साईबाबांची उदी लावून गेलो. माझी नोकरीत नेमणूक झाली. माझ्या कामामुळे ३ वेळा ८५ दिवसांची नोकरी करीत एक वर्ष सरले. चार महिन्याचा ब्रेक मिळाला. त्या रिकाम्या दिवसात पुन्हां दुसऱ्यांदा शिर्डीला गेलो. मनोभावे अभिवादन केले. भगवान के घरमें देर है मगर अंधेर नहीं या प्रमाणेच बाबांच्या श्रद्धा आणि सबूरी या बोदामुळे आयुर्विमा महामंडळात कायमची मोठ्या पगा-राची नोकरी मिळाली. त्याप्रमाणेच मुंबई दूरदर्शन वरील ज्ञानदीपात कार्यक्रम मिळाला. विविध वृत्तपत्रातून लिखाणाला अलोट प्रसिद्धि मिळाली. सामाजिक प्रतिष्ठा मिळाली. ही माझ्या सद्‌गुरु साईबाबांमुळे. सदैव त्यांचे नाम माझ्या मुखातुन स्मरत राहिल.

# ही पण साईलीलाच !

–श्री. ओमप्रकाश व्यवहारे
नायगाव, जि. नांदेड.

० दोन महिन्यापूर्वी मी एका खेडेगावाला कामावर होतो. मला वाचनाचा अतिशय नाद असल्यामुळे मी नायगाव येथील महात्मा ज्योतीबा फुले वाचनालयातून नियमित कादंबऱ्या वगैरे नेत होतो. दोन तीन दिवसातून एकवेळ पुस्तक बदलून नेत असे. परंतु एकदा लायब्ररीतून पुस्तक बदलून नेले आणि त्या खेड्यातील एका मित्राने ते मजजवळून वाचण्यासाठी घेतले व त्याच महिन्यात मला दुसऱ्या एका हंगामी स्वरूपाच्या नोकरीवर जावे लागले. ते पुस्तक त्या मित्राकडेच राहिले. त्याची किंमत ३५ रुपये होती.

दुसरीकडील पण हंगामी स्वरूपाची नोकरी संपवून मी तब्बल तीन महिन्यांनी नायगाव येथे आलो. परंतु त्या मित्राने अद्यापही पुस्तक परत पाठविले नव्हते. म्हणून मी दोनवेळा त्याचेकडे जाऊन पण आलो. तेव्हां तो म्हणाला पुस्तक सापडतच नाहीं. कसून शोध घेतो नाहीच सापडले तर त्याची किंमत पाठवितो. त्यानंतरही मी जवळ जवळ महिनाभर वाट पाहिली. पत्रव्यवहार चालूच होता. कारण इकडे मला लायब्ररीयन ताबडतोब पुस्तक द्या नसेलतर, त्याची किंमत भरा. असे वारंवार बजावत होता. माझी तर इकडे आड व तिकडे विहिर अशी स्थिती झाली होती. कारण मी ह्या वेळेस बेकार असल्यामुळे पैसेपण भरू शकत नव्हतो, व तेव्हांपासून 'ते' पुस्तक परत न केल्यामुळे दुसरेपण मिळत नव्हते. सदरील गोष्टीमुळे मी अत्यंत परेशान होतो. मला काहींच सुचत नव्हते. माझ्या ह्या स्थितीचा कानोसा माझा साईभक्त मित्र गजानन चौधरी ह्याला लागला, तो मला म्हणाला, "अरे असे घाबरू नको. तुझे पुस्तक तुला नक्की मिळेल. (तो पावेतो मला श्रीसाईबाबाची लीला माहितच नव्हती) तू फक्त ह्या मंत्राचे रोज मनोभावे वाचन कर आणि साईबाबांवर श्रद्धा ठेव. त्याच्या म्हणण्यानुसार मी एका गुरुवारपासून साईबाबांवर श्रद्धा ठेवून त्या मंत्राचे वाचन करू लागलो. जो माझ्या मित्राने शिर्डी येथून आणला होता. त्यावेळेस श्री साईबाबांजवळ काहींही मागितले नव्हते.

देव फक्त भावाचा भुकेला असतो हे म्हणतात ते काहीं खोटे नाहीं. त्यानुसार मी फक्त साईची भक्तीच करत गेलो. तेथून बारा कि. मी. अंतरावर तळणी ह्या गावी असलेल्या साईबाबांच्या मंदिराला पण प्रत्येक गुरुवारी जात होतो. जणू माझ्या अंतःकरणात बाबाच वास करीत आहेत असे मला वाटत होते. आणि एके बुधवारीं मला रात्री स्वप्नात बाबांनी दर्शन दिले. तीच तेजस्वी मूर्ती, डोक्यावर छानसे पागोटे आशीर्वाद देणाऱ्या हातावर 'ओम' हे आद्याक्षर मी अत्यंत भारावून गेलो. झोपेतच नकळत माझे हात जोडले गेले. साईबाबा हसतच म्हणाले, "अरे वेड्या असे घाबरतोस का तुझे हरवलेले पुस्तक तुला उद्याच भेटेल. आणि तू बेकार आहेस नां? तू तुझ्या मित्राने दिलेल्या माझ्या मंत्राचे तसेच वाचन ठेव. तुला काही कालावधितच नोकरी पण लागेल." एवढे दोन शब्द बोलून बाबा गुप्त झाले तेव्हां एकीकडे कोंबड्याने बांग पण दिला होता. मी तेव्हां खडबडून उठून इकडे तिकडे पाहत होतो पण बाबांनी मला स्वप्नात दर्शन दिले होते. आता आपले पुस्तक नक्की आज येईल ह्या खात्रीने मी सर्व प्रातःविधी आटोपून पोष्टाकडे गेलो. परंतु अर्ध्या रस्त्यात जाईतो आमचे दुसरे मित्र व टेलीफोन ऑपरेटर श्री शिंदे हे भेटले, आणि म्हणाले अरे ओम तुझे पुस्तक बुकपोष्टने आले आहे. मी आता आणून देतो. असे म्हणून त्यांनी घरुन ते पुस्तक आणून दिले. माझे भाऊ टेलिफोनमध्ये ज्युनियर इंजिनियर असल्यामुळे पोस्टमन फोन खात्यातील कोणत्याही कर्मचाऱ्याजवळ आमचे टपाल देत असे.

मी पुस्तक हातात घेतले व ह्या साईच्या लीलेने अत्यंत भारावून गेलो.

त्यामुळे पुढें त्या पुस्तकाची किंमत रुपये पस्तीस भरण्याचे टळले व साईची ह्या बेकारावर कृपाच झाली. ह्यापुढेही माझी श्रीसाईबाबांवर चांगली भक्ती राहिल आणि संकटकाळात बाबा निश्चितच धावून येतील. आता मात्र एकच आत्यंतिक इच्छा आहे की, श्री साईचे शिर्डीला येऊन दर्शन घ्यावे. ती पण साईलीलेनेच पूर्ण होईल असे वाटते. अशा ह्या दिव्य भव्य माझ्या अंतकरणात वास करून राहिलेल्या बाबांच्या चरणी शतशः प्रणाम!

★

# करंडा सापडला

–सौ. निर्मला चिं. राजे
लीला भुवन
राजारामपुरी, ७ वी गल्ली,
कोल्हापूर.

० मी स्वत: श्री साईबाबांची निस्सीम भक्त आहे. माझ्या भाचीच्या विवाह कार्यातील हा अनुभव आहे.

माझ्या भाचीचे कार्य फारच सुंदर झाले. माझ्या भाचीच्या सासरच्या लोकांनी माझ्याकडे सर्व ओटीचे साहित्य दिले. मी ते सर्व कपाटात ठेवले. कार्य झाल्यानंतर घरी आले. मी तिचा करंडा त्या ओटीत शोधत होते पण मला काहीं तो सापडला नाही. रात्री मला माझ्या मोठ्या बहिणीने एक करंडा दिला, मला वाटले हा आमच्याकडील करंडा दिला आहे. मी भाचीला दिलेला करंडा खूप शोधला पण सापडला नाहीं. त्यावेळी मला खूपच वाईट वाटले व मी चटकन बोलले. बाबा माझा तो करंडा सापडू दे, आणि योगायोगाची गोष्ट म्हणजे माझ्या मोठ्या बहिणीने दिलेला करंडा हा भाचीचा तिच्या सासरच्यांकडून मिळालेलाच करंडा होता. तो करंडा तिला हॉलवर दिसला होता. अशी बाबांची किमया आहे. आता लिहिताना मला फार आनंद होत आहे. कारण करंडा मिळाला आहे.

(पान २४ वरुन)

"साई गजानन" हा लेख लिहून भाविकांना श्रीसाईबाबांचे व श्रीगजाननाचे अग्रेसर स्थान कां हे पटवून दिले आहे. ज्यांच्या भक्तिमुळे लाखो भाविकांना दिलासा मिळतो अशा संतश्रेष्ठ श्रीसाईबाबांचे व श्रीगजाननाचे महत्व आहे. नवसास पावणाऱ्या अनेक देवांकडे धाव घेण्यापेक्षा वरील स्थानाकडे श्रद्धा, प्रेम, भक्ति एकत्रित केल्यास मनोकामना पूर्ण होतातच याचा प्रस्तुत लेखकास अनुभव आहे व इतरांनी अनुभव घ्यावा हीच नम्र प्रार्थना.

वरील अष्टविनायकाप्रमाणे मुंबई व आसपास काही प्रसिद्ध गणपती मंदिरे आहेत. प्रभादेवीचा सिद्धिविनायक, निपुत्रिकांवर कृपा करणारा श्री फडके महागणपती, विवाहानिमित्त नवसास पावणारा टिटवाळा येथील पेशवेकालीन श्री महागणपती, समुद्रकाठी असलेल्या श्रीमहालक्ष्मीचा श्रीदर्यागणेश ही मुंबईतील गणपतीस्थाने प्रसिद्धच आहेत.

त्याचप्रमाणे नांदगावचा श्रीसिद्धीविनायक, मनोरथ पूर्ण करणारा वाईचा श्री ढोल्या गणपती, सारसबागेतील तळ्यातील पेशवेकालीन जागृत श्रीसिद्धीविनायक, पटवर्धन घराण्याला प्रसन्न होऊन राजवैभव देणारा महाजागृत श्रीगजानन (मंगलमूर्ति) हीसुद्धा महाराष्ट्रातील भूषणावह व जागृत देवस्थाने आहेत.

श्रीसिद्धीविनायक प्रभादेवी येथे आता भाविकांची रीघ लागत आहे. भक्तांच्या सुखसोई वाढवण्याचा जरी विश्वस्थांचा मनोदय असला तरी अजून, कायाकल्प झालेला नाही याला तशीच कारणे असतील. विश्वस्थांचे जोरदार प्रयत्न चालू आहेत मग अडथळ्यांचे निवारण करणारा सिद्धीविनायक कसा स्वस्थ राहील? काहीतरी भव्यदिव्य व्हावे असे वाटते. कर्ता करविता शेवटी तोच.

सर्व साईभक्तास श्रीसिद्धीविनायक फलद्रूप होवो हीच सदिच्छा व प्रार्थना.

# साईबाबा नवयुगाचे शिल्पकार

—श्री. प्रमोदकुमार मेरुदास रायसोनी
बी. ए., बी. कॉम., ए. एम्. एम्. एस.
C/o बाबूरावजी काळे यांचा बंगला
जिजामाता कॉलनी, पैठण गेट,
(औरंगाबादकर)

● विचार करता करता मन थकून जाते. कॉलेज संपताच पुढील दिशा दिसत नव्हत्या. लहानपणापासून शिकवले जात होते जीवनात काही तरी करा, पुढे पुढे जीवन खूपच निराशाजनक वाटत होते. निसर्गाचे गूढ शोधण्याची माझी लहानपणापासूनच सवय बनली. लहानपणी खरोखर काहीच माहित नव्हते. जातीभेद, श्रीमंती, गरीबी काही नाही. आयुष्यात पुढे चालत असतांना जबर उन्हाच्या झळा बसू लागल्या सगळीकडे एकच निराशा. ओरडा ओरड तेव्हां कुठे कळून चुकले जीवन खरोखर काय आहे? आपला धर्म म्हणजे काय? आपण जे शिक्षण घेत आहो ते योग्य आहे काय?

दिवसामागून दिवस गेले. स्वामी विवेकानंदांचे नाव ११ वी ला ऐकले परंतु आर्थिक टंचाईने काही सुचले नाही. गोंधळल्यासारखे झाले पुढे स्वामी विवेकानंदांची सर्व पुस्तके वाचण्यात आली. खाडकन् साक्षात्कार झाल्यासारखे झाले खरोखरच खरा धर्म कोणता? खरे ज्ञान ते कोणते?

माझे भाग्य मला शिर्डीस जाण्यास भेटले. जीवन बदलू लागले. आपले ह्या जगात कुणीतरी आहे. आपला धर्म आहे. परमेश्वर आहे. ज्ञान आहे हे कळले ... समजले साईदेवांची सावली मिळाली.

संत साईबाबांचे साधे तत्वज्ञान व स्वामी विवेकानंदांचे तत्वज्ञान, हे एकाच वृक्षाच्या दोन फांद्या नक्कीच आहे. नवयुगाच्या संस्कृतीला योग्य वळण देण्याचे काम ह्या आपल्या देशाच्या महापुरुषाच्या कठोर तपश्चर्याने सार्थक करुन सोडले स्वामी विवेकानंदाने सारे जग हादरून सोडले ते प्रेमाने तर संत

साईबाबाने भक्तांना थक्क करुन सोडले त्यांच्या शांत व अमोघ वाणीने दोघांचे कार्य एकच मानव सेवा. परमेश्वर प्राप्ती.

सतत परमेश्वर चिंतनाने मनाचा संयम आपोआप होतो व साक्षात्कार होतो. सर्व प्राणीमात्रात एकच आत्मा एकच ध्वनी एकच अविष्कार तर मग हे असे का? उत्तर सोपे आहे. आचरण कठीण आहे, तर स्वामी विवेकानंदाने त्याग केला. जीवनाचा. साईदेवाने जीवनात राहूनच धडा शिकवला सोप्या साध्या भाषेत सुचेल अशा पद्धतीत. परमेश्वर आपला पिता आहे. आपण त्याची लेकरे आहोत दया हा मोठा गुण प्रत्येक प्राण्यात सुप्त आहे. ऱ्याला हादरा दोघांनी दिला त्याप्रमाणे पर्जन्याचा वर्षाव व्हावा, गाईला पान्हा फुटावा बीजाला अंकुर फुटावा त्याप्रमाणे. असो साईबाबांनी स्वतःचा देह झिजवून नवयुगाची ओळख सुमारे १०० वर्षपूर्वीच करुन दिली, जाती भेद नको, पंक्ती भेद नको, श्रीमंतीचा ताठा नको, वैर नको, समता ऐक्य ह्याचीच आजच्या नवयुगाला गरज आहे. नवयुगाचा कृष्ण पिता पृथ्वीवर अवतार घेऊन आला, राहिला व गुप्त झाला. फक्त ध्वनी सोडीत.

**"IF YOU LOOK TO ME,**

**I WILL LOOK TO YOU".**

# श्रीसाईबाबांचा चमत्कार

–डॉ. एन. पी. डांगे
मे. ऑ. जि. प. दवा. भोसे
ता. मिरज, जि. सांगली

● आमच्या दवाखान्यात ट्रेंड दाई म्हणून काम करणाऱ्या चव्हाण बाईंनी मला एकदा 'साईलीला' मासिक आणून दिले. ते वाचून पाहिले. अनेकांना अनेक प्रकारचे अनुभव आलेले त्यात वाचावयास मिळाले. ते मासिक आवडल्याने मी ही वार्षिक वर्गणी भरून मासिक चालू केले. इतरांचे प्रमाणे आपणही साई बाबांचे समाधिचे दर्शनास शिर्डीस जावे व आपणासही काही अनुभव येतात हे पहावे असे मी मनाने ठरविले.

१९८१–८२ साली माझी ज्येष्ठ कन्या वंदना ही दहावीचा अभ्यास करीत होती. सुरवातीपासूनच तिचा अभ्यास चांगला होता. माध्यमिक शिष्यवृत्तिही तिला मिळालेली होती. परंतु माझी एक अपेक्षा होती की तिचा भोसे येथील हायस्कूलला पहिला नंबर यावा व प्रथम मानकरींच्या बोर्डावर तिचे नाव लिहिले जावे. परंतु तिच्याच वर्गात दोन मुले तिच्या पेक्षाही हुषार होती व ती मुले आपला पहिला, दुसरा नंबर कधीच सोडत नव्हती. त्यामुळे हिला जरी ७५ ते ८० टक्के मार्कस् पडले असते तरी प्रथम क्रमांक येणेची शक्यता कमीच होती. परंतु साईबाबांचे फोटोपुढे बसून साईबाबांना मागणे मागून घेतले की माझ्या कन्येचा – वंदनाचा या हायस्कूलला पहिला नंबर आला तर ही बातमी मी साईलीला मासिकात प्रसिद्धीस देईन व शिरडीस तुमच्या दर्शनाला आम्ही सर्वजण येऊ.

परीक्षा देणेस सेंटरला सुरू झाली. जाताना साईबाबांची उदी वंदनास जवळ ठेवणेस सांगितली होतीच. सर्वच पेपर्स समाधानकारक गेले. रिझल्ट जसजसा जवळ येऊ लागला तसे मन अधिर होऊ लागले. बेचैनी वाढली विशेष म्हणजे शिर्डीस जाणेचा योगही आला. आम्ही सर्वजण स्पेशल जिपने

शिर्डीस जाऊन आलो. येताना भरपूर उदी घेऊन आलो. व तिथेही समाधी-पुढे पुनः पूर्ववत वंदनाचा प्रथम क्रमांक येवो अशी मनोभावे प्रार्थना केली. शिर्डीहून आल्यानंतर दोन दिवसांनी एस. एस. सी. चा रिझल्ट होता. मनाची चालमेल होतच होती. रिझल्टच्या दिवशी सकाळी ७–३० वाजता हायस्कूलचा शिपाई घरी आला व त्याने सांगितले की वंदना डांगेचा हायस्कूलला प्रथम क्रमांक आलेला आहे. मी खूप आनंदित झालो. साईबाबांचे प्रेमाने मन भरून आले व ताबडतोब देवघरात जाऊन साईबाबांचे फोटोला वंदन करून पुन्हा हायस्कूलमध्ये प्रत्यक्ष रिझल्ट पाहून आलो. तिचा हायस्कूलला पहिला नंबर आला होताच एवढेच नव्हे तर संस्थेच्या ३ ही हायस्कूलमध्ये ती प्रथम आली होती. त्यामुळे तर खूपच आनंद झाला.

अशा तऱ्हेने साईबाबांनी माझे म्हणणे ऐकले व तेव्हांपासून बाबांचे बद्दल माझे मनामध्ये अधिकच भक्ति व प्रेम निर्माण झाले. व तेव्हांपासून मी रोज साईबाबांचे फोटोपुढे बसून 'ओम श्री साईबाबा' या मंत्राचा जप करीत असतो. त्यानंतर मी 'साईसच्चरित' ही पोथीही मागविली व तिचेही मी दोनदा पारायण केले आहे.

ज्या ज्या वेळी आमच्यावर संकटे येतात किंवा अडचणी येतात तेव्हां तेव्हा बाबांची आम्ही मनोभावे प्रार्थना करतो व संकटमुक्त होतो. असाच यापुढेही बाबांनी आम्हांस संकटाचे वेळी धीर द्यावा, व त्यांचा आशीर्वाद आमचे पाठीशी असावा अशी मनोभावे त्यांचे चरणी प्रार्थना!



# साईकृपेने बदली रद्द झाली

—श्री. मधुकर मंडलिक
मु. पो. ता. नवापूर जि. धुळे

० श्री सद्गुरु साईबाबांचे अलौकिक अनुभव त्यांच्यावर नितांत श्रद्धा बाळगणाऱ्या भक्तांना वेळोवेळी येत असतात. ज्या ज्या भक्तांनी आजही अंतःकरणपूर्वक हाक मारली, त्यांना मोठ्या अडचणीतून ...संकटातून... आपत्तीतून वाचविल्याचा अनुभव बाबांच्या निर्वाणानंतरही येत असतात. असाच एक ज्वलंत अनुभव अगदी अलिकडेच मला आहे.

मी बाबांची दररोज पूजा–आरती–प्रार्थना करतो तसेच कुटुंबातीलही सर्वांची बाबांवर पूर्ण श्रद्धा आहे. दासगणू रचित 'श्री साईनाथ स्तवन मंजरी' रोज नित्यनेमाने वाचण्याचा माझा परिपाठ असल्याने कुटुंबातील कोणावरही संकट आले तर बाबा धावून येतात व ते संकट लागलीच दूर करतात.

कोण्या एका भविष्यकाराने सांगितले होते सन् १९८२ वर्ष बहुतेकांना अशांती ... धोका ... तसेच तापदायक जाईल त्याप्रमाणे मलाही सन् १९८२ ची अविस्मरणीय आठवण राहिली. आमच्या वरिष्ठ कार्यालयाकडून बातमी आली की, यावेळेस सीनियर लोकांच्या बदल्या होणार आहेत.

या बातमीने तर मी हबकलोच कारण नवापूर शाखेत मीच सीनियर असल्याने माझी बदली होणार हे शंभर टक्के सूर्यप्रकाशाइतके स्वच्छ होते. तरी देखील माझा बाबांवर दृढविश्वास होता की, माझे बाबा माझी काळजी घेतील, माझी व मुलांची गैरसोय होऊ देणार नाहीत. माझी मोठी मुलगी एस. एस. सी. ला असल्याने तिचे यंदाचे वर्ष फार महत्त्वाचे होते. नववी पर्यंतचे शिक्षण एकाच हायस्कूलला झाल्याने बदलीमुळे शिक्षणाची अन्यत्र गैरसोय झाली असती व मलाही नवीन जागी रूजू व्हायचे म्हणजे सारेच अपरिचित. अशा धास्तावलेल्या मनस्थितीत मी बाबांचा जप करीत असे.

वरीष्ठ कार्यालयाकडून आलेली बातमी अखेर खरी ठरली दि. ७–४–१९८२ च्या ऑर्डरीत माझी बदली साकोली झाली. बहुतेकांना वाटायचे बदली रद्द होणार नाही व नवीन नेमणूकीच्या जागी रूजू व्हावेच लागेल.

माझ्या मित्रमंडळीनी बदली रद्द होण्याच्या दृष्टीने प्रयत्नही केलेत परंतु एक–दीड महिना प्रयत्न करूनही प्रतिसाद मिळाला नाही त्यामुळे आमच्या कंपनीत निराशचे वातावरण निर्माण झाले. माझी तर बाबांवर असीम श्रद्धा होती की, आपली बदली रद्द होईलच. अता जो काळ आहे तो कसोटीचा आहे. या कसोटीत आपण उतरले पाहिजे. मी जराही डगमगलो नाही. बाबांना म्हटले, "बाबा, शरण आलेल्या माझ्या सारख्या भक्ताचे काम वाया जाऊ देऊ नकोस जर माझी बदली रद्द झाली तर मी आलेला अनुभव "श्री साईलीला" मासिकाला पाठवीन.

**शरण मज आला आणि वाया गेला**

**दाखवा दाखला ऐसा कोणी**

या साईवचना प्रमाणे कोणीही विन्मुख होत नाही. साईबाबा भक्तांना म्हणतात "Why should you fear when I am here ? Cast all your burden on me and I will bear them," याप्रमाणे मी संकटांना म्हणजे बदलीला मुळीच घाबरलो नाहीं. दोन महिन्यापर्यंत कार्यमुक्त झालो नाहीं व तसे करण्याविषयी सुद्धा तगादा झाला नाहीं. तरीदेखील मनाचा तोल व श्रद्धा सारखी खालीवर होत होती.

बदली रद्द करण्याची ऑर्डर काढणे अशक्य आहे असे काही ऑफिसरांनी सांगितले. परंतु जगाचे सर्वोच्च ऑफिसर साईमाऊली पाठीशी असल्यामुळे दि. ९–६–८२ ला बदली रद्दची ऑर्डर आली. माझा तर विश्वास बसत नव्हता. खरोखरच साईकृपेने अशक्याचे शक्य झाले. बाबा भक्तांसाठी स्वतःचे वचन कसेही करून पुरे करतात

बाबा नेहमी म्हणत —

"झालो जरी गत प्राण
वाक्य माझे माना प्रमाण
माझी हाडे तुर्बतीमधून
देतील आश्वासन तुम्हांस ।
मी काय पण माझी तुर्बत
राहील तुम्हांसंगे बोलत
जो तीस अनन्य शरणागत
राहील डोलत — तयास्थळे ।

आज समाधी घेऊन बाबांना ६५ वर्षे झाली असली तरी बाबांची समाधी भक्तांना पावन असते. वचनात म्हटलेच आहे की —

माझ्या समाधीची पायरी चढेल
दुःख हे हरेल सर्व त्याचे ।

असे दुःख हरण्याची हमी बाबांच्या समाधीने भक्तांना दिली आहे. कोणीही समाधीला कधी विसरू नये कारण सर्व दुःख दूर करण्याची हमीच समाधीने दिली आहे.

एका अनामिक कविने म्हटले आहे की, "ओ शिरडीवासी साईबाबा ... तुझी समाधि चेतन दिसते ...तुझी समाधी आशिष देते ... एकाची तक्रार ऐकते ...अनेकांचे दुःख हरिते ...बाबा समाधी आत जागते ...तुझी समाधी
अशा महादेव अवतारी बाबांना माझे शतशः प्रणाम!

# शिर्डीच माझे पंढरपूर

—श्री. लक्ष्मण बापूराव रापतवार.
किल्ला वॉटर वर्क्स, नांदेड.

० नरहरी सोनार शिवभक्त होता. त्याने आराधना करुन शिव शंकरास प्रसन्न करुन घेतले होते. तो दररोज सकाळीच चंद्रभागेत स्नान करुन मल्लीकार्जुनाची पूजा करीत असे. तो पंढरपूरात राहून पांडुरंगाचे दर्शन तर काय परंतु त्या मंदिराच्या शिखराकडेसुद्धा चुकून पहात नसे. त्याची शंकरावर श्रद्धा व दृढ विश्वास होता. तो दुसऱ्या देवाची भक्ती करीत नसे. जसे तान्हया बाळास माते शिवाय कोणीच आवडत नसते. अथवा पतीव्रतेस पती शिवाय दुसरा देव नसतो तशी त्याची शिव भक्ती होती.

एका सावकाराने पांडुरंगास नवस केला होता की, मला मुलगा झाला तर मी सोन्याचा करगोटा तुझ्या कमरेस बांधीन. त्यास मुलगा झाला. त्याने पांडूरंगाचे दर्शन घेतले व तेथील पुजाऱ्यांना विचारले की येथे कोणी चतुर सोनार आहे का? सर्वांनी त्यास नरहरी सोनाराचे नाव सुचविले. सावकार हिरे, रत्न व सोने घेऊन नरहरी सोनाराकडे आला व मला पांडुरंगास करगोटा करुन द्या म्हणाला. तुम्ही जी मजूरी मागाल त्यापेक्षा जास्तच रक्कम मी देईन असे ही त्याने सांगितले.

नरहरी सोनारास कोडे पडले, त्याने तर पांडुरंगाचे देवळाच्या कळसाकडे सुद्धा पाहिले नव्हते. तो सावकारास म्हणाला तुम्ही दोरीने कमरेचे माप आणून द्या म्हणजे मी त्या मोजमापाप्रमाणे करगोटा तयार करुन देईन. सावकारास आश्चर्य वाटले की हा पंढरपूरात राहून पांडुरंगाच्या दर्शनाचा विटाळ करतो. परंतु त्याच्यापेक्षा कुशल कारागीरही तेथे नव्हता म्हणून सावकाराने दोरीने माप आणून दिले. नरहरीने अती सुशोभित हिरेजडीत सुंदर करगोटा तयार करून दिला. ब्राम्हणाने अभिषेक वगैरे करून करगोटा कमरेस बांधावयाचा प्रयत्न केला पण तो कमी पडू लागला सावकाराने पुनः तो करगोटा नरहरीकडे आणून दिला. जेवढा कमी पडत होता तेवढा मोठा करुन ताबडतोब सावकारास दिला. पुनः सावकाराने पांडुरंगाच्या कमरेस तो बांधण्याचा प्रयत्न केला तेव्हां तो पुष्कळच मोठा होऊन बसला.

हीरेजडीत सोन्याचा करगोटा घडीत लहान तर घडीत मोठा होत असलेला पाहून सावकाराने नरहरी सोनारास फारच विनवणी व काकुळती केली की तेथवर येऊन तुम्हीच कमरेचे माप घ्यावे. त्यावर नरहरीने डोळ्यास घट्ट कापडाची पट्टी बांधली व सावकाराने त्याचा हात धरून पांडुरंगाच्या मूर्ती-जवळ नेले व कमरेच्या मापा करता हात वर धरले, तेव्हां नरहरी सोनाराच्या डोळ्यावरची पट्टी आपोआप सरकली व पहातो तो त्यास साक्षात् शंकराच्या अवतारात पांडुरंग दिसले. दशभुजा, पंचवदन, गळ्यात सर्पांचे वेटोळे, मस्तकी जटा शोभायमान, सर्व अंगास विभूति, अंगावर वाघाच्या कातड्याचे वस्त्र धारण करून विटेवर उभा असलेले शिवशंकरच त्याला दिसले, त्याला वाटले की हेच तर माझे कुल दैवत आहेत म्हणून त्याने पुन: देवाकडे पाहिले तो त्याला साक्षात पांडुरंगाचे दर्शन घडले. पुन: त्याने डोळ्यास पट्टी बांधली, व हाताने माप घेता घेता पट्टीतून चोरून पाहिले तो त्याला पुन: शंकराचेच दर्शन घडले. त्याने डोळ्यावरची पट्टी काढली तर त्याला पांडुरंगाचेच दर्शन घडले. त्याच्या मनास अनुताप झाला की मी आजवर विनाकारण भेदभाव मनात धरला. पंढरीनाथ व कैलासनाथ दोन्ही वेगवेगळे नसून एकच आहेत. त्याला साक्षात्कार झाला, त्याने पांडुरंगाचे चरण धरले व क्षमा मागितली की हे शिवशंकरा मला क्षमा कर आजवर मी द्वैतभाव धरला होता तो आता नाहीसा झाला. माझे डोळे उघडण्याकरता व अज्ञान दूर करण्या करताच त्वा सावकारास हा नवस करावयास लावला. त्यावर पंढरीनाथ हसले व म्हणाले की अरे आजवर त्वा केलेली भक्ती मलाच पावन झाली म्हणूनच तर मी तुला प्रत्यक्ष दर्शन देण्याकरता येथे बोलावले. नरहरी सोनाराचा भ्रम नाहीसा झाला व सर्व ठायी परमेश्वर एकच आहे. कोणत्याही देवाची भक्ती केल्यास ती परमेश्वरासच पावन होते. तेव्हांपासून नरहरी सोनार हरी भजनात व कीर्तनात तल्लीन झाला. त्याची किर्ती वाढली व तो सर्वश्रेष्ठ भक्त बनला.

त्याचप्रमाणे प्रत्येक भक्ताला साईबाबांनी त्याच्या इच्छीत देवते प्रमाणेच दर्शन दिले. कोणाला ते राम, कोणाला कृष्ण, तर कोणाला कमरेवर हात ठेऊन पंढरीनाथच उभे आहेत असे दर्शन ते देत.

नानासाहेब चांदोरकर साईबाबांचे निस्सीम भक्त ते मामलतदार होते. त्यांची बदली नंदुरबारला झाली. तेव्हां ते साईबाबांच्या दर्शना करता सहकुटुंब सहपरीवार निघाले. अगोदर साईबाबांचे दर्शन घेऊन नंतर पंढरपूरास जावे असा

त्यांचा हेतु होता. त्यांनी शिरडीस कोणासही पत्र पाठविले नव्हते, व कोणास ते येणार म्हणून कल्पनाही नव्हती. परंतु अंतर्ज्ञानी साईबाबांचे डोळे चोहोकडे असतात. नानासाहेब गावाच्या शिवेवर असतील त्यावेळी बाबा म्हाळसापती, अप्पा, शिंदे, काशीराम ह्या भक्तांबरोबर बोलत बसले होते. एकाएकीच साईबाबा म्हणाले की पंढरीचे दार उघडले आहे. आपण सर्वजण मिळून भजन करू, बाबा स्वतःच म्हणू लागले –

"पंढरपूरला जायाचे जायाचे, तिथेच मजला राहायचे "
"तिथेच मजला राहयाचें राहयाचें, घर ते माझ्या रायाचें"

सर्वजण मिळून वरील ओव्या म्हणत असतानाच नानासाहेब येऊन उतरले व सर्व परिवारासह साईचरणी नमन केले. नानासाहेब आश्चर्यचकित झाले की बाबांना सर्वच काहीं अवगत झाले आता हीच आपली पंढरी व साईबाबाच पंढरीनाथ म्हणून पाया पडले. तीर्थप्रसाद घेतला व बाबांच्या आशीर्वादाने धन्य झाले, व बाबांच्या आज्ञेने पंढरपूरास जावयास निघाले.

एकदा तात्यासाहेब नूलकरांचे मित्र डॉ. पंडीत साईबाबांच्या दर्शनाकरिता आले, मशीदीत जाऊन दर्शन घेतले व थोडावेळ निवांत बसले, बाबानी डॉक्टरांना दादा भटाच्या घरी त्वरीत जाण्याची आज्ञा दिली. तेव्हां दादा साईबाबांच्या पूजेचे साहित्य घेऊन बाहेर निघाले डॉक्टर पंडीतही त्यांच्या समवेत आले. दादानी बाबांची पूजाअर्चा केली. डॉक्टर पंडीतने दादांच्या तबकातून गंधाची वाटी घेतली व बाबांच्या कपाळी सुरेख त्रीपुंड्र रेखीला. दादा मनातच घाबरले. कारण बाबांच्या कपाळी गंध लावण्याची परवानगी कोणासही नव्हती. आता बाबा रागात येऊन काय अनर्थ घडेल म्हणून दादा चिंतीत झाले. परंतु साई बाबा एकही अक्षर बोलले नाहीत उलट त्यांची मुद्रा प्रसन्न दिसत होती. सायंकाळी दादानी साईबाबांस विचारले की तुम्ही आम्हां भक्तास कपाळास स्पर्श देखील करू देत नाहींत, रागावता व सटका मारावयास धावता मग आज सकाळी या डॉक्टर पंडीतास तुम्ही चकार शब्द सुद्धा काढला नाहीत ह्याचे कारण काय, त्यावर बाबा म्हणाले की अरे त्याचा गुरु ब्राम्हण आहे. त्याच्या मनात मी मुसलमान आहे म्हणून शंकासुद्धा आली नाहीं व मला त्यांनी गुरु समजूनच गंध लावले त्याने मला फसविले मी त्याच्या अधीन झालो. दादास बाबा गंमतीने काहीतरी सांगत आहेत असे वाटले. परंतु संध्याकाळी जेव्हा

दादा व डॉक्टरच्या गप्पा चालल्या तेव्हां डॉक्टराने सांगितले की माझे गुरु धोपेश्वरीचे रघुनाथ महाराज आहेत, ज्यांना "काका पुराणिक" म्हणतात. मी साईबाबांस माझे सद्‌गुरु समजूनच गंधाचा टीळा लावला. साईबाबा त्यांच्या मनातील भक्तीभाव पाहून स्वतः काका पुराणिक बनले.

राव बहादूर हरी विनायक साठे हे बाबांचे परमभक्त होते. त्यांनी यात्रे-करूंच्या उतरण्याकरिता शिरडीत एक वाडाही बांधला. साठे यांच्याकडे मेघा नावाचा एक सेवक होता. तो शिवभक्त. नित्यनेमाने तो शिवलिंगाची पूजा करी. पुढे रावबहादूर साठे यांनी मेघाला शिरडीस साईबाबांच्या सेवेसाठी पाठविले. शंकराची पूजा सोडून एका मुसलमान फकीराची सेवा व पूजा करण्याचा मालकाचा हुकूम ऐकून मेघाला फार वाईट वाटले. साठ्यांनी त्याची समजूत घातली. व बाबांच्या खऱ्या स्वरूपाची थोडी ओळख करून दिली. तेव्हां थोडे समाधान वाटून मेघा शिर्डीस आला. द्वारकामाईच्या आवारात पाय ठेवताच साईबाबा एकदम हातात दगड घेऊन उठले व रागाने म्हणाले खबरदार वर आलास तर, चालता हो, मुसलमानाकडे कशाला आलास? मेघाला थरकाप सुटला तो घाबरला परंतू बाबांचा हा राग वरवर होता. अंतरी तो दयेचा सागर होता मेघासही आश्चर्य वाटले, की इतक्या लांबची गोष्ट बाबांस कशी समजली. तो थोडे दिवस राहून सेवा करीत राहिला परंतु मनी दृढ विश्वास बसेना म्हणून तो परत घरी गेला. तेथे त्याला ज्वराने पछाडले तो त्रस्त झाला. पुनः त्याला बाबांचा ध्यास लागला व शिर्डीस परत आला, त्याची साईचरणी श्रद्धा वाढत गेली व तो साईचा परम भक्त बनला. त्याने साईबाबांना शंकरा-चाच अवतार समजून पूजा करावयाची. नेहमी त्याच्यामुखी शंकर शंकराचा जप चालावयाचा. कोस दीड कोस जाऊन बेलपत्री आणावयाची व साईबाबांची

पूजा करावयाची. सर्व गावातील दैवतांची पूजा करून दुपारच्या साईबाबांच्या आरतीचा मान त्यास मिळत असे. एके दिवशी सर्व गावातील देवांची पूजा त्यानी केली परंतु खूप प्रयत्न करूनही खंडोबाच्या देवळाचे दार उघडेना इकडे दुपारची आरतीची वेळ होत असल्यामुळे तो मशीदीत आला. त्याच्या मनांत खंडोबाच्या पूजेची तळमळ होतीच. तो मशिदीत येताच अंतर्ज्ञानी बाबा त्यास म्हणाले त्या एका देवास का वगळले जा त्वरीत जाऊन पूजा आटोपून ये. तो परत खंडेरायाच्या देवळात आला तेव्हां दार उघडे पाहून त्यास आश्चर्य वाटले. ही सर्व साईबाबांचीच लीला होती. एकदा मकरसंक्रांतीस मेघाच्या

मनात गोदावरीच्या पाण्याने साईबाबांस स्नान घालावे अशी इच्छा झाली. त्याने बाबांस विचारले तेव्हा बाबा म्हणाले की तुझी जशी इच्छा असेल तसे कर परंतु एक अट लक्षात ठेव माझे फक्त डोकेच भिजले पाहिजे. अंगावर पाणी टाकू नकोस. मेघाने आठ कोस पायी चालत घागरभर गोदावरीचे उदक आणले. घंगाळ्यात पाणी ओतले व बाबांस पाटावर बसवून चंदन लावले, बाबांनी डोके पुढे केले व थोडेसेच पाणी डोक्यावर टाक म्हणून सांगितले. परंतू मेघाने डोक्यावर पाणी टाकता टाकता प्रेमाने उचंबळून हर हर गंगे म्हणून घागरभर पाणी डोक्यावर रिचविले, व म्हणाला, माझा शंकर संपूर्ण न्हाला. म्हणून मला आनंद वाटत आहे. परंतू त्याने पाहिले तेव्हां त्यास आश्चर्याचा धक्का बसला की बाबांचे डोकेच तेवढे भिजले होते. अंगावर पाण्याचा एक थेंबही नव्हता. धोतरही भिजले नव्हते. मेघास नवल वाटले ज्याप्रमाणे गंगा फक्त शंकराच्या जटातून वाहते त्याचप्रमाणे ही साईबाबांची लीला होती. मेघाची साईचरणी दृढ श्रद्धा बसली. त्यास साईबाबांने कोणीतरी आणून दिलेली शंकराची पिंडी पूजे करता दिली, व मेघास म्हणाले ह्या शंकराची मनोभावाने त्रिशूळ काढून पूजा कर. मेघाची साईबाबांवर भक्ती वाढतच गेली. त्याला साईबाबा शिवरूपच दिसत होते व त्याने आपले अखंड आयुष्य साईबाबांच्या सेवेत अर्पण केले.

साईबाबांची गुरुकिल्ली अगदी निराळी आहे. जशी कासवी आपल्या पिलांना काहीं न देता आपल्या नजरेने त्यांचे पालन-पोषण करीत असते त्याच प्रमाणे बाबांनी कोणालाही उपदेश अगर मंत्र न देता आपल्या कृपादृष्टीनेच निरनिराळ्या वेळी भक्ताच्या योग्यतेप्रमाणे त्यांना ब्रम्हानंद मिळवून दिला. जगाच्या पाठीवरील सर्व धर्मीय लोक संतास मान देतात, त्यांच्या चरणकमली आपली मस्तके नम्र करतात राव, रंक सर्वच संतांच्या चरणी लीन होतात व त्यांना परमेश्वर समजूनच भजतात. इच्छित वस्तू प्राप्त करून देणारी जशी कामधेनू, कल्पीत वस्तू मिळवून देणारा कल्पवृक्ष, लोहाचा सुवर्ण करून देणारा जसा परीस त्याचप्रमाणे संताच्या सेवेने त्यांच्या भक्तीने इच्छित मनोरथ पूर्ण होत. त्यांच्या लोहरूपी दुर्वृत्ती मावळून त्या ठिकाणी सुवर्ण रुप, सद्गुण झळकतात व संताच्या अशीर्वादाने ते मोक्षपदाचे अधिकारी बनतात.

गणेश दत्तात्रय सहस्त्रबुद्धे म्हणजेच "दासगणू महाराज" हे पूर्वी पोलीस खात्यात होते. त्यांना लावण्या व तमाशाचा नाद होता. पूर्वजन्माच्या पुण्याई-

मुळे ते महाराजांच्या (साईबाबांच्या) दर्शनाकरिता आले, त्यांनी पोलिस खात्यातील नोकरीचा राजीनामा दिला व साईबाबांच्या सेवेत रुजू झाले. साईबाबांच्या आशीर्वादाने त्यांना "संत कवी दासगणू महाराज" ही पदवी मिळाली. एकदा शुभपर्वकाळ आलेला पाहून दासगणूंच्या मनात गंगा यमुनाच्या संगमावर प्रयाग क्षेत्रात स्नान करण्याचा विचार आला. शिरडीला बाबांच्या परवानगी शिवाय कोणासही बाहेर गावी जाता येत नसे. दासगणू साईबाबां जवळ गंगा स्नानास जाण्याची परवानगी मागण्यास गेले. बाबा मधुर हास्य करून काय जरूरी आहे, आपले प्रयाग येथेच आहे, मनामध्ये दृढ विश्वास मात्र पाहिजे. इतके बोलताच खरोखरच अद्‌भूत चमत्कार घडला. दासगणूंनी बाबांची आज्ञा शिरसावंद्य मानून पायावर डोके ठेवले आणि बाबांच्या दोन्ही अंगुष्ठीतून गंगा यमुनाच्या पवित्र पाण्याचा झरा झुळू झुळू वाहू लागला हा चमत्कार पाहून दासगणूंना गहिवरून आले त्यांचे डोळे पाण्याने भरले आणि बाबांची अगाध लीला पाहून आनंदात म्हणाले.

शिरडी माझे पंढरपूर । साईबाबा रमावर
शुद्धभक्ति चंद्रभागा । भाव पुंडलिक जागा
या हो या हो अवघे जन । करा बाबांसी वंदन
गणू म्हणे बाबा साई । धाव पाव माझे आई ।।

"अनंत कोटी ब्रम्हांड नायक राजाधिराज योगीराज"

"सद्‌गुरु सच्चीदानंद श्री साईनाथ महाराज की जय"

# साईबाबांच्या दर्शनाला जायचं

(चाल – दत्त दर्शनाला जायाचं)

साईबाबांच्या दर्शनाला जायाचं जायाचं जायाचं . . .
आनंद पोटात माझ्या मावेना मावेना
आनंद गगनात माझा मावेना ।।धृ.।।

गेलो शिर्डीला थेट
घेतली साईची भेट
या या भक्ताची भूक काही भागेना भागेना भागेना ।।१।।

गेलो वनात थेट
घेतली साईची भेट
सूर्याचा प्रकाश काही डोंगराआड राहिना राहिना राहिना ।।२।।

आला लिंबोणीखाली थेट
घेतली बाबांची भेट
त्या कडुलिंबोणीचा रस कडू लागेना लागेना लागेना ।।३।।

गेलो मशिदीत थेट
घेतली साईची भेट
या–या भक्ताची तहान साईविना जाईना जाईना जाईना ।।४।।

आनंद गगनात माझा मावेना मावेना मावेना

–श्री. संतोष गोविंद भिगार्डे
घाटकोपर, भटवाडी, मच्छीमार्केटच्या पाठीमागे,
दत्त निवास, खो. नं. ११
घाटकोपर, मुंबई ४०० ०८४.

# कुठे शोधिसी साईनगरी

कुठे शोधिसी 'साईनगरी' कुठे शोधिसी साई
असूनि अंतरी उगा शोधिसी त्याच द्वारकामाई ।।धृ.।।

अग्नी पेटवुनी चिमटयातून, चिलीम उचलोनी चांदभाईला
दृष्टि देवुनि अंधाला, सृष्टी दाविली मार्तंडाला
वास्तव्यासी भरूनी राहिला, कां बघसि रे आकाशी ऽऽऽ
कुठे शोधिसी साई ।।१।।
पाणी ओतूनी पणत्यामधुनी, दिवे जाळीले पुण्यनगरी,
कधी फकिरी वेषी फिरूनी, अन्नासाठी द्वारो–द्वारी,
रूप घेऊनि द्वारी तुझ्या, येत असे साक्षाती ऽऽऽ
कुठे शोधिसी साई ।।२।।

चमत्कार घडे त्या लीलांमधुनी, व्याधि पळतसे त्या उदीतूनी
श्रद्धेचा उपमंत्र देवुनि, सबुरीसाठी वाट पाहोनि
जागृत करीती बाबासाई, किमया करोनी भजनी ऽऽऽ
कुठे शोधिसी साई ।।३।।

साई पहुडती त्या विटेवरी, साई डोलती त्या शिळेवरी
कधी प्रचिती माध्यमातूनी, दिसती तुजला त्या स्वप्नांपरी
हाय पामरा, मनी वसूनि कां होतोस रे उदासी ऽऽऽ
कुठे शोधिसी साई ।।४।।

कुठे शोधिसी साईनगरी कुठे शोधिसी साई
असूनि अंतरी उगा शोधिसी त्याच द्वारकामाई ।

–श्री. संजय केशव परळकर
नाना निवास, (तिसरा मजला,)
गोखलेरोड, (साऊथ)
दादर पोलिस स्टेशन समोर, दादर, मुंबई २८.

# मी तुझे काय बिघडविले

हे साई बाबा मी तुझे काय बिघडविले
तू दर्शन मला नाहीं दिधले
तुझ्या दर्शनाचे वेड मला लागले
तू माझे मनोगत नाही पुरविले
हे साई बाबा ........॥१॥

रात्रंदिवस तुझे ध्यान केले
तू स्वप्नांत पण दर्शन नाहीं दिधले
असे काय माझ्याच्याने चुकले
हेच मला अजूनही नाहीं समजले
हे साई बाबा ..........॥२॥

मला कधी वाटते तू टाकून मला दिले
पण जर असे झाले तर मग सर्व नष्ट झाले
मग या मिथ्या जगात काय उरले
हे साई बाबा ..........॥३॥

आता तरी घे माझ्या विनंतीची काळजी
समजेन मी त्याला माझी धन संपत्ति निजी
नको करू आता येण्याला उगीच उशीर
नाहीं तर तुटून जाईल माझा धीर ।
हे साई बाबा ..........॥४॥

—प्रो. एच. डी. महाले, एम्. एस्सी.
अध्यक्ष, गणित विभाग,
ज. ह. शासकीय महाविद्यालय, बैतूल, म. प्र.

## नांदा सौख्यभरे

### डॉ. इनामदार व डॉ. मुळे शुभविवाह

श्रीसाईलीलाच्या लेखिका व शिरडी येथील श्रीसाईनाथ विद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षिका सौ. उषाताई प्रभाकर मुळे यांची कन्या डॉ. संजीवनी एम. डी. हिचा विवाह डॉ. अविनाश इनामदार एम. एस., यांचे बरोबर १८ ऑगस्ट १९८३ रोजी कस्तुरबा हॉल, राहुल चित्रपट गृहाजवळ, गणेशखिंड रोड, येथे मोठ्या थाटाने साजरा झाला. वधूवरांना शुभाशिर्वाद देण्याकरिता विविध क्षेत्रातील नामवंत मंडळी हजर होती. वधूवरांचे मनःपूर्वक अभिनंदन.

# साई भगवान

(अहिराणी गीत)

उंडारना वारा वारा
जेठ आखाडमा
पडे पानीन्या धारा
शिरडी गावमा ।।

आमी जातस जत्राले
पानी उघडेना
वारा वाजे पखाले
कोनज ऐकेना ।।

तुना साई दर्सनाले
उभ्या आया बाया
माथा टेकी पायरीले
धन्य आत्मा झाया ।।

सई करे कट कट
जलदी जावाना
माले झाये आवघड
शिरडी गावमा ।।

लीला म्हने वनवन
नको करू बाबा
साई मऱ्हा भगवान
राहे शिरडीमा ।।

—सौ. लीला डी. मराठे धुळे

## श्रीसाईनाथ सेवा मंडळ, नवापूर

रविवार ता. २४–७–८३ रोजी गुरुपौर्णिमा उत्सव शिवालय मंदिर, घनदाट रोड, येथे थाटात साजरा झाला. समारंभाचे प्रमुख पाहुणे म्हणून नवापूरचे प्रतिष्ठित नागरिक व रूपम चित्रमंदिरचे मालक श्री. ताराचंद रामचंद्र चौधरी हे उपस्थित होते.

# श्री. गणेशपंत दिघे साईचरणी विलीन



श्रीसाईबाबा संस्थान शिरडीच्या दादर येथील साई निकेतन या कार्यालयातील वरिष्ठ लेखापाल कु. रेखाताई दिघे यांचे पिताजी श्री. गणेश नारायण दिघे यांचे सोमवार ता. ८ ऑगस्ट ८३ रोजी सकाळी ८ वा. १० मि. हृदयविकाराच्या झटक्याने देहावसान झाले. निधनसमयी त्यांचे वय ८२ वर्षाचे होते.

श्री गणेशपंत हे मूळ गुजरातमधील कडीपाटणचे. शिक्षणाच्या निमित्त्याने ते मुंबईला आले. माटुंगा येथील व्ही. जे. टी. आय. मधून त्यांनी विव्हिंग मास्टर्सचा अभ्यासक्रम पूर्ण केला होता. मुंबापुरीतील त्यावेळच्या सुप्रसिद्ध अशा मधुसूदन मिलमध्ये ते विव्हिंग मास्टर होते. तेथली त्यांची कारकीर्द गाजली. उत्तमप्रकारे तेथील सेवा करुन ते योग्यवेळी सेवानिवृत्त झाले. त्यांच्या तेथल्या गौरवपर कारकिर्दीमुळे अनेक गिरण्यांमधून सल्लागार म्हणून त्यांना निमंत्रणे आली परंतु ती त्यांनी स्वीकारली नाहीत. परदेशातूनही विशेषत: जपान मधूनही त्यांना निमंत्रण आले होते पण तेही त्यांनी स्वीकारले नाही.

भक्तीमार्गाकडे त्यांचा ओढा होता. वाचनाची त्यांना मनस्वी आवड होती. ते दत्ताचेही उपासक होते.

त्यांच्या पश्चात् त्यांच्या पत्नी श्रीमती शारदा, चार कन्यका व तीन पुत्र व असंख्य मित्र परिवार आप्तनातलग, नातवंडे आहेत.

श्रीसाईबाबा संस्थान शिरडी दिघे कुटुंबियांच्या दु:खात सहभागी आहे.

श्रीसाई मृतात्म्यास चिरशांती व सद्गती देवो.

# शिरडी वृत्त माहे जुलै १९८३

या महिन्यात गुरुपौर्णिमा उत्सवाकरिता आलेल्या साईभक्तांची व श्रीसाईबाबांचे दर्शनाकरिता पंढरपूर यात्रेस जाणारे व पंढरपूरहून येणारे अशा साईभक्तांची फारच गर्दी झाली होती. हा उत्सव शनिवार दि. २४–७–८३ ते सोमवार दि. २६–७–८३ पर्यंत श्रींच्या समाधी मंदिरात मोठ्या थाटात साजरा झाला. नामांकित कलाकार सुर-मणि कमलाकर परळीकर, परभणी, श्री. चंद्रशेखर गाडगीळ, सौ. रश्मी गाडगीळ, श्री. जयवंत कुलकर्णी, श्री. प्रकाश घांग्रेकर, मुंबई वगैरे कलाकारांच्या हजेऱ्या आल्या. ह. भ. प. गंगाधरबुवा व्यास, डोंबीवली यांचे कीर्तन झाले.

**गुरुपौर्णिमा उत्सव – पहिला दिवस** :– शनिवार दि. २३–७–८३ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले ५–१५ वा. काकड आरती झाली. सकाळी ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधि मंदिरातून गुरुस्थानमार्गे द्वारकामाईत गेली. त्याठिकाणी "श्रीसाईसच्चरित" अध्याय वाचनास सुरवात झाली. श्रींचे मंगलस्नान, अभिषेक, पूजा, आरती नित्याचे कार्यक्रम झाल्यावर दुपारी ४–३० ते सायंकाळी ६–३० पर्यंत ह. भ. प. श्री. गंगाधरबुवा व्यास, डोंबिवली यांचे सुश्राव्य कीर्तन झाले. रात्री ७–३० ते ९–०० व ९–३० ते ११–०० पर्यंत सूरमणि श्री. कमलाकर परळीकर, परभणी यांचे गायन झाले. रात्री ९–१५ वा. श्रींच्या पालखीची मिरवणूक निघाली. पालखीस आकर्षक विद्युत रोषणाई करण्यात आली होती. ११–३० ला पालखीची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस** :– रविवार दि. २४–७–८३ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडले. उत्सवाचा मुख्य दिवस असल्यामुळे साईभक्तांची गर्दी बरीच होती. ५–१५ वा. काकड आरती सुरू झाली. ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची अध्यायवाचन समाप्ती मिरवणूक द्वारकामाईतून गुरुस्थान मार्गे समाधि मंदिरात आली. त्यानंतर श्रींचे मंगलस्नान झाले. नित्याचे कार्यक्रमा व्यतिरिक्त दुपारी ४–३० ते ६–३० पर्यंत ह. भ. प. गंगाधरबुवा व्यास यांचे कीर्तन झाले.

सायंकाळी ७ वा. धुपारती झाल्यावर रात्री ९–१५ वा. श्रींच्या रथाची मिरवणूक समाधी मंदिरातून वाद्यांच्या गजरात निघाली, सनई, चौघडा, टाळ,

मृदुंग, गायन, भजन, रहाता बँडपथक, पुणे येथील मयूर ब्रॉस बँड पथक, डफ, ढोल, अशा थाटात लाईटने सुशोभित केलेला रथ संस्थानचे गुरुस्थान नजिक आला. त्या ठिकाणी संस्थान कर्मचारी व ग्रामस्थ लोकांनी भारूड-गारूड कार्यक्रम केले. पुण्याचे श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर, यांनी नकलांचे कार्यक्रम केले. भारूड-गारूड कार्यक्रमात सर्वश्री तुकाराम परदेशी, एकनाथ पा. कोते, रविंद्र जोशी, रामचंद्र पा. कोते, किसन हनुमंता पा. गोंदकर, श्री. बापू आरणे, बाबू जाधव, श्री. अण्णा सुर्यभान गोंदकर, रमेश उदावंत शिरडी यांनी भाग घेतला. त्यानंतर रात्री १२-३० वा. मिरवणूक मंदिरात आली, व मिरवणकीतील लोक कलाकारांच्या कार्यक्रमात सामील झाले. साईभक्तांना श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले ठेवण्यात आले होते.

**उत्सवाचा ३ रा दिवस :-** सोमवार दि. २५-७-८३ रोजी सकाळी ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. सकाळी ७-३० ते ८-३० पर्यंत गुरुस्थान ठिकाणी रुद्राभिषेक झाला. सकाळी ११ ते १२-०० पर्यंत ह. भ. प. गंगाधरबुवा व्यास यांचे कालाकीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर माध्यान्ह आरती झाली. व साईभक्तांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला. रात्रौ ७-३० ते १०-०० पर्यंत श्री. प्रकाश धांग्रेकर, मुंबई यांचे गायन झाले. त्यानंतर शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

काहीं कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली. ती खालीलप्रमाणे :-

**कीर्तन** - १) ह. भ. प. गजानन महाराज, कुंभेफळ.
२) ह. भ. प. विश्वनाथबुवा आळेकर भिवंडी
३) ह. भ. प. गंगाधरबुवा व्यास डोंबिवली
४) सौ. अनुसुयाबाई कडूकार. यवतमाळ.

**प्रवचन** - १) ह. भ. प. जगन्नाथ महाराज वाघचौरे, शिरडी.
२) ह. भ. प. रघुनाथ कृष्ण कारखानीस, पुणे.

**भजन, गायन, वाचक, नृत्य वगैरे :-** (१) श्री. साईनाथ भजनी मंडळ, शिरडी, (२) श्री. साईधाम भजनी मंडळ, बोरीवली, (३) श्री. हरीनाम संकीर्तन भजनी मंडळ, बेळगाव, (४) श्री. आर. गंगाधर, मुंबई, (५) श्री. दीनानाथ ठाकरे, नागपूर, (६) सौ. निर्मला नायडू, शिरडी, (७) पंडीत असराज, मुंबई, (८) कु. पद्मजा फेणाणी, माहीम, (९) श्री. भँवरलाल मुदंडा

नासिक रोड, (१०) श्री. मनोहर हरीभाऊ लोणकर, पुणे, (११) श्री. गोविंद शामराव लोणकर, (१२) श्री. सुनिल शामराव लोणकर, (१३) श्री. गगाधर जाधव, (१४) श्री. राजाराम गगाधर जाधव, (१५) श्री. जगन्नाथ जयंता नगरकर, (१६) श्री. तुकाराम माधवराव दैठणकर, (१७) श्री. अशोक माधवराव दैठणकर, (१८) श्री. श्रीराम व्ही. सातर्डेकर, परेल, (१९) श्री. ललितकुमार जोशी, (२०) श्री. शिवाजी घुमाळ, शिरडी, (२१) सूरमणि श्री. कमलाकर मु. परळीकर, परभणी, (२२) सौ. शकुंतला कमलाकर परळीकर, (२३) श्री. शशांक शहाणे, (२४) श्री. किरण भावटणकर (२५) श्री. यज्ञेश्वर लिंबेकर, (२६) श्री. ज्ञानेश्वर जगन्नाथ नगरकर, (२७) श्री. शांताराम लक्ष्मण राऊत, (२८) श्री. दामूअण्णा दळवी, श्रीरामपूर, (२९) श्री. पांडुरंग गुरव, (३०) श्री. अशोक दामूअण्णा दळवी, (३१) श्री. भोलानाथ रा. समेळ, मुंबई, (३२) श्री. रावसाहेब देशमुख, अमरावती, (३३) सौ. लक्ष्मीबाई थत्ते, श्रीरामपूर, (३४) श्री. नाईक सर, (३५) सौ. सुलोचना कुलकर्णी, (३६) सौ. शरयू मराठे, शिरडी, (३७) सौ. शकुंतला जोशी, नासिक, (३८) श्री. नामदेव गणपत शिंदे, दौंड, (३९) श्री. तुकाराम महादेव दैठणकर, (४०) श्री. गजानन दत्तात्रय दैठणकर, (४१) श्री. दत्ताराम गणपत साळुंके, मुंबई, (४२) श्री. कल्याण चौधरी, कलकत्ता, (४३) श्री. अब्दुल कादर नियाझी, (४४) श्री. जयवंतराव कुलकर्णी, मुंबई, (४५) श्री. अरविंद म्हात्रे, मुंबई, (४६) श्री. अनंत पांचाळ, (४७) श्री. मनोहर कदम, (४८) श्री. सुरेश कुलकर्णी, (४९) श्री. मनोहर धडले, मुंबई, (५०) श्री. मोहन कळवा, (५१) श्री. धनंजय कदम, (५२) श्री. यशवंत गव्हाणकर, (५३) लीलाधर काटकर, (५४) श्री. देवीदास वाघचौरे, (५५) श्री. चंद्रशेखर गाडगीळ, (५६) सौ. रश्मी गाडगीळ, (५७) श्री. संजय भिडे, पुणे (५८) श्री. हरीश शहा (५९) श्री. आदेश बाबूराव पुणे (६०) श्री. दत्तात्रय खेडकर (६१) रेखा मडावी, नागपूर, (६२) विमल शिर्के, (६३) राजकुमार बार्शीकर पुणे, (६४) श्री. पुंडलिक दगूजी वाघ (६५) श्री. शामू पुंडलीक वाघ, (६६) श्री. शिवराम बिडवे, संगमनेर, (६७) श्री. नंदकुमार पुरोहित, शिरडी, (६८) श्री. आप्पा सामंत, मुंबई, (६९) श्री. शेख नबाव अमर पटेल, अस्तगाव, (७०) श्री. राजाभाऊ देशपांडे, पुणे, (७१) सदाशिवराव जाधव, सांगली, (७२) क्षीरसागर विठ्ठलराव, (७२) श्री. जानोबा तात्याबा वाडेकर, (७३) श्री. ज्ञानेश्वर वैद्य, शिरडी, (७४) श्री. ललीतकुमार देवकृष्ण जोशी, (७५) श्री. श्रीकृष्ण सदाशिव भिडे, (७६) श्री. सिद्धेश्वर सोपानराव पिल्ले, (७७) श्री. अशोक आढाव, पुणे, (७८) श्री. कुलकर्णी महेश जनार्दन, (७९) सौ. सविता गीजरे, शिरडी, (८०) श्री. एस. व्ही.

धुमाळ, (८१) श्री. अरुण सोमण, संगमनेर, (८२) श्री. प्रकाश बरडे, संगमनेर, (८३) श्री. भिकाजी बिडवे, शिरडी, (८४) श्री. संजय कुलकर्णी, सावळीविहिर, (८५) निर्मला नायडू, शिरडी, (८६) श्री. नागेश गंगाधर दिवाकर, पूणे, (८७) भाग्यशाली अनिलराव कन्नडकर, वैजापूर, (८८) श्री. चद्रशेखर मनोहर देशपांडे, पुणे, (८९) श्री. सुहास कुलकर्णी, मुलुंड, (९०) श्री. मधुकर सोनवणे, बडोदा, (९१) श्री. राजेंद्र दत्तात्रय राऊत, (९२) श्री माधव तुकाराम तुपे, पुणे (९३) श्री. सखाराम राघुजी गुरव, कोपरगाव, (९४) रंजन लांजेकर, (९५) श्री. दिलीप बिडवे नासिक (९६) श्री. मनोहर हरीभाऊ लोणकर, पुणे, (९७) श्री. सुनील लोणकर, (९८) श्री. प्रसाद पुडे, (९९) श्री. गंगाधर धोंडोबा जाधव, (१००) श्री. जितेंद्र गंगाधर जाधव, (१०१) श्री. वसंत दामोदर रासने, (१०२) श्री. शिवाजीराव कदम. समशेरपूर, (१०३) श्री. बाळासाहेब गंगाधर साधू, (१०४) श्री. मुरली उंबरीकर, नागपूर, (१०५) श्री. नंदकुमार जगन्नाथ आढाव, मयुर ब्रास बँड, पुणे, (१०६) श्री. शशीकांत दळवी, मुंबई, (१०७) श्री. विलास राजाराम महाडीक, (१०८) श्री. सतीश राव, (१०९) श्री. शिवदास शिरोडकर, (११०) श्री. सुरेश राजाराम आंजर्लेकर, (१११) श्री. अभयकुमार मीरे, (११२) श्री. राजनशेठ सातघरे, (११३) श्री. अनिल कोंडकर, (११४) श्री. मारुती (बारकूशेठ), (११५) श्री. वसंत जोशी, (११६) श्री. विलास पावसकर, (११७) श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर, पुणे, (११८) श्री. यशवंत नाईक, मुंबई, (११९) श्री. विलास परळकर, (१२०) श्री. विवेक मुळे, (१२१) श्री. महेश सावर्डेकर, (१२२) श्री. प्रदीप रासन, नगर, (१२३) श्री. प्रदीप पडसे, मुंबई, (१२४) श्री. रमेश नार्वेकर, (१२५) श्री. संदीप यशवंत चव्हाण, (१२६) श्री. प्रकाश बाबूराव खाडगळ, वसई, (१२७) श्री. कमलाकर तपस्वी, पुणे, (१२८) श्री. श्रीपाद शंकर साठे, दौंड, (१२९) श्री. प्रभाकर दत्तात्रय पारखे पुणे (१३०) श्री. न. र. यणराव तपस्वी, पुणे (१३१ श्री. अनिल बागलाणे, पुणे, (१३२) श्री. बावाजी गरुड, (१३३) श्री. सुर्यकांत जाधव, (१३४) श्री. बी. एस. भागवत, (१३५) श्री. वसंत धुमकर, सेंट्रल रेल्वे रोवर्स टीम, मुंबई, (१३६) श्री. जयंत जगन्नाथ नगरकर, (१३७) श्री. संगम मित्र मंडळ, सातपाडी, (१३८) श्री. प्रकाश कुटेमाट्, मुंबई, श्री (१३९) श्री. सुरेश गमरे, (१४०) श्री. प्रकाश धांग्रेकर, मुंबई, (१४१) श्री. भोजराज साळवी, (१४२) श्री. दादा महाजन, (१४३) श्री. बर्वे, (१४४) श्री. त्रिवेदी (१४५) श्री. चंद्रसेन साळगावकर, शिरडी, (१४६) श्री. आनंद दत्तात्रय करंबेळकर, शिरडी, (१४७) श्री. शांताराम मिराणे, (१४८) श्री. रघुनाथ नागरे, (१४९) श्री. चतुर्धन नागरे, (१५०) श्री. माणिक साळी, (१५१)

श्री. मधुकर भालेराव, (१५२) डॉ. ठोसर, अखिल भारतीय गुरुदेव सेवा मंडळ, गुरुकुंज, अमरावती, (१५३) श्री. वनवासी मंडळ, कोल्हेवाडी, (१५४) श्री. ज्ञानेश्वर भजनी मंडळ, नांदुर्खी,

**हवापाणी** :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही. शिरडीत प.वम.चे प्रमाण कमी आहे. श्रीसाईबाबांचे लेंडीबागेतील बावडीची खोली वाढविणेत आल्याने बरेचसे पाणी उपलब्ध झाले आहे. त्या पाण्याचा वापर सध्या भोजनगृहाकरिता होत आहे.

उत्सवाचे मुख्य दिवशी संस्थानचे वतीने श्री. साईनाथ हॉस्पिटल, शिरडी येथे हाफकिन इन्स्टिटयूट, मुंबई यांचे सहकार्याने रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले होते. शिरडी वासियांनी, संस्थान कर्मचारी व साईभक्तांनी रक्तदान केले. एकूण १०५ लोकांना रक्तदान केले. रक्तदान करणाऱ्यास संस्थान तर्फे एक स्टीलची थाळी भेट देण्यात आली. या शिबीरास सौ. चंगप्पा, श्री. अयर्णीकर, व सौ. जावकर, मुंबई, डॉ. प्र. श्री. देशपांडे, व डॉ. म. य. देशमुख यांनी अपार कष्ट घेऊन शिबीर यशस्वी केले.

उत्सव व्यवस्थितरित्या पार पाडण्याचे कामी संस्थानचे कोर्ट रिसीव्हर श्री. क. हि. काकरे, शासकीय अधिक्षक, श्री. नद. चि. पाठक, मुख्य लेखाधिकारी श्री. वि. श्री. आपटे आणि सर्व खाते प्रमुख व संस्थान कर्मचारी वर्ग यांनी अत्यंत परिश्रम घेतले.

## श्री. निवृत्ती गोंदकर पाटील यांचे निधन

शिरडी येथील रहिवासी श्री. निवृत्तीनाथ गोंदकर पाटील यांचे १९–४–८३ रोजी शिरडी येथे निधन झाले. श्रीसाईलीला लेखक कवी स्नेह संमेलनास ते नित्य येत असत, व भक्तिभावाने अभंग पदे म्हणत असत. शेवटपर्यंत त्यांची प्रकृती ठणठणीत होती. विशेष म्हणजे ते श्रीसाईबाबांना पाहिलेले, त्यांचे अनेकदा दर्शन घेतलेले व जवळ जवळ त्यांच्याच सहवासातील एक भक्त होते. त्यांनी उभ्या हयातीत श्रीसाईबाबांच्या वेळेपासून तो शेवटपर्यंत शिरडी कधी सोडली नाही.

श्रीसाई त्यांच्या आत्म्यास चिरशांती देवो.

# साईबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. व पॅकींग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | २२=०० | ६=०० |
| २) | ,, | इंग्रजी | १३=५० | ४=०० |
| ३) | ,, | हिंदी | १२=०० | ४=०० |
| ४) | ,, | गुजराथी | १२=०० | ४=०० |
| ५) | ,, | कन्नड | १०=०० | ४=०० |
| ६) | ,, | तेलगू | १३=०० | ४=०० |
| ७) | ,, | तामीळ | १२=०० | ४=६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७=५० | ३=०० |
| ९) | ,, | हिंदी | ७=०० | ३=५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४=२५ | ३=०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४=०० | ३=०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०=३५ | ३=०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०=३० | ३=०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०=५० | ३=०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०=५० | ३=०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १=२५ | ३=०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ५=०० | ३=०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०=७५ | ३=०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४=०० | ३=०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४=५० | ३=०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १=७५ | ३=०० |
| २३) | ,, | इंग्रजी | १=७५ | ३=०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २६) | ,, | हिंदी | १=७५ | ३=०० |

**Regd. No. MH/BYE/26**
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

( कव्हर पृष्ठ ३ वरून )

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०=५० | ३=०० |
| १८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५=२५ | ३=०० |
| १९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १=५० | ३=०० |
| २०) | ,, | मराठी | १=५० | ३=०० |
| २१) | शिरडी गाईड | गुजराथी | १=५० | ३=०० |
| २२) | ,, | हिंदी | छपाई चालू | आहे. |
| २३) | रुद्राध्याय | मराठी | ०=९० | ३=०० |

२४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठी व इंग्रजी वार्षिक वर्गणी
१०=०० प्रत्येकी प्रत १=००
( व्ही. पी. ची पद्धत नाही )

| अ.क्र. | फोटोचे नाव | फोटो साइज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०' | १=६५ | ३=०० |
| २) | ,, | १०"×१४ | १=१० | ३=०० |
| ३) | ,, | ७"×१०' | ०=५५ | ३=०० |
| ४) | ,, | ४"×५" | ०=२० | ३=०० |
| ५) | ,, | २"×३" | ०=१५ | ३=०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा ( रंगीत ) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ७) | ,, ( काळा पांढरा) | १४"×२०" | १=६५ | ३=०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २=७५ | ३=०० |
| ९) | ,, | १३"×१८" | १=०० | ३=०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा ( रंगीत फोटो ) | १०"×२० | १=१० | ३=०० |
| ११) | ,, ( काळा पांढरा) | १०'×१४" | ०=८५ | ३=०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो ,, | ९'×१२' | १=१० | ३=०० |
| १३) | ,, ( रंगीत ) | ९"×१२' | १=६५ | ३=०० |
| १४) | निळा | ९×१३ | ०=७५ | ३=०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पत्र्याचे कॅलेंडर | — — — | १६=०० | ८=०० |

मुद्रक : पांडुरंग मोरे बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि., ४२, श्री. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व प्रकाशक : श्री. क. हि. काकरे, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लाट नं. ८०४ बी. दादर, मुंबई १४